# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

विश्व हिन्दू परिषद
धर्मो रक्षति रक्षितः

■ शके १९४७ ■ वर्ष २५ ■ अंक ११ ■ फेब्रुवारी २०२६ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या ३६

■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 25 ■ ISSUE NO 11 ■ February 2026 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 36





घर असो वा गाडी, शिक्षण अथवा व्यवसायवृद्धी...
तुमचे स्वप्नं साकार करायला मदत जनता बँकेची!
जनता
गृहकर्ज
योजना
व्याजदर 7.75%* च्या पुढे | ₹3 कोटींपर्यंत अर्थसहाय्य
शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज
जनता
एज्युफ्लेक्स
कर्ज योजना
देशांतर्गत शिक्षणासाठी
₹ 50* लाख
परदेशी शिक्षणासाठी
₹ 1* कोटी
आकर्षक व्याजदर
जनता
वाहनकर्ज
कर्ज योजना
सुलभ प्रक्रिया । त्वरित कर्जवितरण
आकर्षक व्याजदर
आता प्रत्येक व्यवहार करा ‘कॅशलेस’...
कारण जनता बँक सदैव तुमच्याबरोबर!
सुरक्षित, सोपी व गतिमान
इंटरनेट बँकिंग सुविधा
व्यापारी वर्गासाठी
कार्ड स्वाईप मशिन
रोजच्या व्यवहारांसाठी
जनता रुपे डेबिट कार्ड
तुमच्या सर्वप्रकारच्या बँकिंग व्यवहारासाठी
मोबाईल बँकिंग सेवा
BHIM JetPay
we proudly supporting... Digital India
BHARAT BILLPAY
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.janatabankpune.com
*अटी व नियम लागू

मासिक
**हिंदुबोध**
वर्ष – पंचवीस : अंक ११ वा
शके १९४७
फेब्रुवारी २०२६

संपादक
श्री. रविकांत कळंबकर
ravi.kalambkar@gmail.com

निवास
एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध

संपादक मंडळ
श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार-प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार-प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

संपादक मंडळ सदस्य
श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार
व्यवस्थापक
मनोज शेलार
मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/-, वार्षिक वर्गणी रु. २००/-

मुद्रण स्थळ
संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

# अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... भक्ती-शक्ती-युक्ती चा योग
श्री. श्रीपाद रामदासी .............................. ०५
✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त .............................. ०६
✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले .............................. १५
✦ केल्याने देशाटन
प्रमोद रामदासी .............................. १७
✦ महाशिवरात्री – शिकवण आत्मसंयमाची
ॲड. स्वाती जेरे .............................. १८
✦ आधुनिक विज्ञान – नवनिर्माण की पुनर्शोध (लेखांक २)
हणमंत नाडगौडा .............................. २०
✦ हिंदू म्हणविणारा मार खाऊ लागला
डॉ. सचिन लादे .............................. २२
✦ माणसं खोटं का बोलतात?
ब्रह्मानंद घुगरे .............................. २३
✦ आत्मनिर्भरतेमुळे भारत अधिक बलवान
काशिनाथ देवधर .............................. २४
✦ स्वच्छ भारत – शाश्वत भारत
माधवी सौंशी .............................. २६
✦ निर्मलतेचा दुवा : संत गाडगेबाबा
श्रीपाद रामदासी .............................. २८
✦ निर्णयप्रक्रिया आणि धर्म
अमित देवधर .............................. ३०
✦ रा.स्व.संघ. महाराष्ट्र प्रांत शिबीर, तळजाई पुणे .............................. ३२

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## तुम्ही आम्ही सकल हिंदू बंधु बंधु

तुम्ही आम्ही सकल
हिंदू बंधु बंधु !
तो महादेवजी पिता आपुला,
चला तयाला वंदू!!

ब्राह्मण वा क्षत्रिय, चांग जरी झाला !
कसलेही रूप व रंग जरी ल्याला !
तो महार अथवा मांग सकलाला !
ही एकची आई हिंदुजाती आम्हांस, तिला वंदू!!

एकची देश हा अपुल्या प्रेमाचा!
एकची छंद जीवाच्या कवनाचा!
एकची धर्म हा आम्हा सकलांचा!
ही हिंदू जातीची गंगा, आम्ही तिचे सकल बिंदू !!

रघुवीर रामचंद्रांचा जो भक्त !
गोविन्दपदाम्बुजी जो जो अनुरक्त !
गीतेसी गाऊनी पूजी भगवंत !
तो हिंदू धर्म, नौकेत बसुनिया तरतो भवसिंधू !!

उभयांनी दोष उभयांचे खोडावे !
द्वेषासी, दुष्ट रुढीसी सोडावे!
सख्ख्यासी आईच्यासाठी जोडावे !
आम्ही अपराधांसी विसरुनी, प्रेमा पुन्हा पुन्हा सांधू!!

लेकुरे हिंदू जातीची हि आम्ही !
आमुच्या हिंदू धर्मासी त्या कामी !
प्राणही देऊनी रक्षू परिणामी !
ह्या झेंड्याखाली पूर्वजांचीया, एकाची नांदू !!

**स्वातंत्र्यवीर सावरकर. रत्नागिरी – १९२५**

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

| | | |
|---|---|---|
| **श्री. रविकांत कळंबकर** | **श्री. किशोर चव्हाण** | **श्री. पांडुरंग राऊत** |
| (संपादक) | (प्रांत मंत्री) | (प्रांत अध्यक्ष) |

# भक्ती - शक्ती - युक्ती चा योग हाच हिंदुराष्ट्र योग

## संपादकीय

माघ वद्य नवमी म्हणजे राष्ट्रसंत सद्गुरू श्री समर्थ रामदास स्वामी यांची पुण्यतिथी अर्थात दासनवमी. याच अनुषंगाने समर्थ रामदास स्वामी यांचे विचार, चरित्र यांचा आढावा घेऊयात.

साधारणपणे १३ शतकाच्या उत्तरार्धात यावनी जुलमानी महाराष्ट्रासह अवघा हिंदुस्थान जर्जर झाला होता, यावनी जुलूम आणि मनुष्यनिर्मित भेदा-भेदामुळे महाराष्ट्रीय समाज होरपळून निघत असताना, संतमंडळींनी भागवत धर्माच्या पताकेच्या छायेत भक्तिमार्गाचा उत्सव सुरु केला.

यावनी आक्रमणांमुळे लोप पावणारा धर्म; ईश्वरनिष्ठेमुळे पुनरुज्जीवित होत होता पण राज्य मात्र अधर्म्यांचेच होते. अश्या या धामधुमीच्या काळातच एक शक्ती-भक्ती आणि युक्तीचा संदेश देणारा आवाज सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यात घुमू लागला 'जय जय रघुवीर समर्थ' तो आवाज होता सद्गुरू श्री समर्थ रामदास स्वामी यांचा.

भगवंताच्या प्राप्तीसाठी वयाच्या १२ व्या वर्षी घराबाहेर पडलेल्या समर्थांनी, १२ वर्षे गोदावरी काठी टाकळी येथे साधना केली आणि मग पुढे १२ वर्षे देशाटन केले होते हे सर्वश्रुतच आहे. याच २४ वर्षांच्या कालखंडात त्यांच्या कार्याची बीजे रोवली गेली असे म्हणता येईल. आपल्या १२ वर्षाच्या देशाटनामुळे त्यांच्या कार्याची दिशा आणि लक्ष्य हे दोन्हीही निश्चित झाले. अवघा हिंदुस्थान फिरत असताना, देशस्थिती, लोकस्थिती आणि मुख्य म्हणजे धर्मस्थिती यांचे निरीक्षण समर्थांनी केले होते.

एकप्रकारे अल्पसंख्यांक असूनही केवळ परस्पर ऐक्य आणि आक्रमकता यामुळे प्रबळ झालेला यावनी समाज तर दुसरीकडे बहुसंख्यांक असूनही एकमेकांतच कलगीतुरा असणारा हिंदू समाज समर्थांनी पहिला होता अनुभवला होता.

धर्माची होणारी विटंबना, देशाचा होणारा सांस्कृतिक आणि आर्थिक ऱ्हास या सगळ्याला थांबवायचे असेल तर 'एक सशक्त, अनुशासनप्रिय आणि मुख्य म्हणजे देव-देश-धर्म' यांचा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या समाजाची निर्मिती करणे, समाजात जागृती आणणे अत्यावश्यक आहे हे समर्थांनी जाणले.

त्यांना असे जाणवले की; सद्य स्थितीमध्ये समाजापुढे भक्तिमार्गाबरोबरच शक्तिमार्गाचा आदर्श ठेवणे आवश्यक आहे.

चारित्र्याच्या बाबतीत मर्यादा पुरुषोत्तम असणारा श्रीराम, कुटुंबियांच्या हट्टासाठी वनवास भोगलेला कुटुंबवत्सल श्रीराम, पितृवचनांकित पुत्रोत्तम श्रीराम, दैत्य दुर्जनांचा नाश करणारा कोदंडधारी श्रीराम तर रयतेच्या हट्टापायी प्रसंगी स्वतःच्या पत्नीचाही त्याग करणारा प्रजावत्सल श्रीराम हाच युवकांना, प्रौढांना आदर्श ठरतो.

समाजाला केवळ भक्तिमार्ग सांगून पुरेसे नव्हते, समाजामध्ये स्वामी निष्ठा, बृहत पराक्रम करण्याची आकांक्षा, बुद्धीचातुर्य आणि मुख्य म्हणजे बलोपासना करण्याची आवड निर्माण करणे हे देखील आवश्यकच होते. त्यामुळे गुणांचा आदर्श श्रीरामांची तर कृतीचा आदर्श हनुमंताचा हेच सूत्र तरुणाईपुढे ठेवून त्यांना धर्मभक्तीतून राष्ट्रभक्तीकडे नेण्याचे कार्य समर्थानी प्रारंभ केले.

आपल्या देशाटनाच्या काळामध्येच समर्थानी महाराष्ट्राच्या बाहेर देखील मठांची स्थापना केली. देशाटनानंतर समर्थ जेंव्हा देशाच्या पश्चिमेत म्हणजेच महाराष्ट्रात परत आले (साधारण पणे इ. स.१६४५) तेंव्हा महाबळेश्वर येथे हनुमान मंदिराची स्थापना करून गावातील युवकांना दीक्षा दिली.

महाराष्ट्रभर पसरलेल्या खेड्यापाड्यांतून, भिक्षेच्या निमित्ताने भ्रमण करत समाजमनावर देव देश आणि धर्म यांचे रक्षण करण्याचा संस्कार करण्यास प्रारंभ केला. समर्थानी केलेला उपदेश हा केवळ पोथीबाज समाज करणारा नव्हता तर तो धर्मकारणा बरोबरच राजकारणाचेही महत्व सांगणारा होता.

समर्थ स्थापित मठाच्या व्यवस्था, परस्परांशी असणारा संपर्क पाहता; समर्थांचे संघटन उभारणीचे धोरण देखील स्पष्ट होते. प्रत्यक्ष राजकारणात भाग न घेता, सांप्रत राजकारणाला पूरक आणि पोषक धर्मकारण करणे हा समर्थांच्या कार्याचा गर्भितार्थ म्हणता येईल.

समर्थांना अभिप्रेत धर्मकारण हे थोतांडवादावर आधारित नव्हते, तर ते सारासार विवेकावर आधारलेले, सत्यशोधन करणारे, प्रयत्नवादी डोळस धर्मकारण होते.

धर्मकारण आणि राजकारण यामध्ये आवश्यक असणारी एक सामायिक बाब समर्थानी सांगितली; ती म्हणजे प्रयत्नवाद !

कधी कधी विचार येतो की; समर्थानी सांगितलेली शक्तीची उपासना, धर्मनिष्ठा जर आजच्या युवकांमध्ये जागृत झाली तर केवळ महाराष्ट्रच नव्हे तर अवघ्या हिंदुस्थानच्या यशोधुंदुभीची कमान आकाशापर्यंत पोहोचेल आणि खऱ्या अर्थाने हिंदुराष्ट्राची निर्मिती होईल.

**श्री. श्रीपाद श्रीकांत रामदासी**



# भारत हे हिंदुराष्ट्रच आहे! - नितीन महाजन

## शौर्य संचलन व त्रिशूळ दीक्षा सोहळा संपन्न

राहाता (दिनांक : १२ जानेवारी २०२६) मभारत हे हिंदुराष्ट्रच आहे!फ असे प्रतिपादन बजरंग दल प्रांत संयोजक नितीन महाजन यांनी श्री सावतामहाराज मंगल कार्यालय, राहता (शिर्डी) येथे रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी केले. विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत आणि बजरंग दल उत्तर अहिल्यानगर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शौर्य संचलन व त्रिशूळ दीक्षा सोहळ्यात नितीन महाजन बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर महंत आत्मारामगिरी महाराज, विश्व हिंदू परिषद – पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहमंत्री आणि ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतिश गोरडे, बजरंग दल प्रांत सहसंयोजक संदेश भेगडे, विभाग मंत्री सुनील खिस्ती, राष्टीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह प्रा. दीपक जोंधळे, जिल्हा मंत्री विशाल वाकचौरे, बजरंग दल जिल्हा संयोजक शुभम मुर्तडक, हृषीकेश भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

नितीन महाजन पुढे म्हणाले की, 'मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांनी या देशाच्या भूमीला मातेचे स्थान देऊन वंदनीय मानले. छत्रपती शिवाजीमहाराज आणि छत्रपती संभाजीमहाराज यांनी जिवाची बाजी लावून स्वराज्याच्या माध्यमातून अठरापगड हिंदूंना संघटित केले. असे असूनही आपल्या देशात हिंदूंवर अन्याय आणि अत्याचार होतात. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल यांची हिंदूंचे एकत्रीकरण, पालनपोषण आणि संरक्षण करण्याची जबाबदारी आहे. त्यासाठी या दोन्ही संघटनांचे कार्यकर्ते अहोरात्र कार्यरत आहेत; पण देशातील समस्त हिंदू समाज जागृत झाला पाहिजे म्हणून हिंदूंनो उठा! जागृत व्हा! प्रशिक्षित व्हा! आपल्या हिंदुराष्ट्राला सक्षम करण्यासाठी संघर्ष करा!' ॲड. सतिश गोरडे यांनी, 'हिंदू समाजापुढील आवाहने पाहून पूजनीय गोळवलकर गुरुजी यांनी हिंदू धर्मातील सर्व संप्रदाय आणि पंथांचे पूजनीय संत व महंत यांना एकत्र करून विश्व हिंदू परिषदेची स्थापना केली. स्थापनेपासून विश्व हिंदू परिषदेने अनेक आंदोलने यशस्वी केलीत. आजच्या घडीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले भारतीय संविधान याला न मानणारी पिलावळी निर्माण झाली आहे. त्यामुळे आपण प्रखंड, उपखंड, मंडल, ग्राम स्तरावर संविधान पूजन केले पाहिजे. तसेच संविधानाने दिलेल्या अधिकारांची माहिती आज सर्वांपुढे मांडणे गरजेचे आहे!' असे आवाहन केले. प्रा. दीपक जोंधळे यांनी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष सुरू असून त्यानिमित्ताने गृहसंवाद अभियानात घराघरांत संघविचार पोहोचविण्यात येणार असल्याचे सांगितले. संदेश भेगडे यांनी पाश्चात्त्य संस्कृतीचे उदात्तीकरण, लव्ह जिहाद, वाढती व्यसनाधीनता, बाहेरील अपायकारक फास्ट फूडचे वाढते सेवन याविषयी चिंता व्यक्त करून याबाबत प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राहाता येथील श्री. सावतामहाराज मंगल कार्यालयापासून शौर्य संचलन करण्यात आले. त्यामध्ये भगवा ध्वज घेऊन बजरंग दलाचा गणवेश, हातात दंड, हनुमानाची भव्य गदा घेऊन बजरंगींचे शिस्तबद्ध पद्धतीने संचलन राहाता शहरातील प्रमुख मार्गांवरून जाताना शहरातील नागरिक, माताभगिनी यांनी पुष्पवृष्टी करून, रांगोळी काढून भव्य स्वागत केले. ग्रामदैवत वीरभद्र महाराज यांच्या मंदिरासमोर सर्व नगरसेवकांनी व नागरिकांनी पुष्पवृष्टी करून संचलनाचे स्वागत केले. यावेळी राहाता नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, तसेच श्रीरामपूर नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक अर्जुन दाभाडे, नेवासा येथील कृष्णा परदेशी यांना शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. जिल्हा सह मंत्री गोपाळ राठी, योगेश मखाना, प्रशांत बेल्हेकर, प्रशांत बहिरट, साई पानसरे, शुभम साबदे, आर्यन शिंदे, नवनाथ मुर्तडक, विठ्ठल रोडे, हेमंत बंड आणि मंदार जोशी यांनी संयोजन केले. कान्हा मखाना यांनी सूत्रसंचालन केले.



प्रांताचे मा. उपाध्यक्ष श्री दिलीपजी कोटीभास्कर, शीख संप्रदायाचे श्री. गुरुनानी दिनदर्शिकेचे स्वागत करताना!



## सशक्त राष्ट्र निर्मितीसाठी दुर्गावाहिनी काळाची गरज!

### प्रांत मंत्री श्री. किशोरजी चव्हाण

दुर्गावाहिनी शौर्य प्रशिक्षण वर्ग कात्रज जिल्हा. ब्लु हॅवन्स स्कूल येथे प्रशिक्षण वर्गचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व मार्गदर्शक पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री श्री. किशोरजी चव्हाण यांनी समारोपा वेळी मार्गदर्शन करतांना, अशा प्रशिक्षणाची आवश्यकता का आहे याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच ज्या समाजात स्त्रीचा आदर केला जातो तेथे प्रत्यक्ष देवतांचे वास्तव्य असते. प्राचीन काळात जेव्हा समाज, धर्म संकटात सापडला तेव्हा प्रत्येक वेळी स्त्रीशक्तीने दुर्गेचा अवतार धारण करून दुष्ट शक्तीचा नाश केला. याकरिता आपण प्रत्येक जिल्हास्तरावर, शौर्य प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करीत आहोत. आज पर्यंत हजारो युवती या वर्गामध्ये प्रशिक्षित होऊन आपापल्या स्थानी दुर्गावहिनी चे कार्य करीत आहेत. आपणही असुरक्षित वातावरणात स्वतःला कणखर व आत्मनिर्भर बनण्यासाठी दुर्गावाहिनीच्या या कार्यात सामील व्हावे असे आवाहन केले.

शनिवार दिनांक ३ जानेवारी व रविवार दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी, ब्लु हॅवन्स स्कूल येथे प्रशिक्षण वर्गचे आयोजन केले होते. दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी दुर्गांचे एकत्रीकरण करण्यात आले.

त्यानंतर दुपारी ४:३० मिनिटांनी शौर्य प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन झाले. सुरुवातीस मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून, त्रिवार ओंकार एकात्मता मंत्र व विजय महामंत्र घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रास्ताविक जिल्हा मंत्री श्री शार्दूल ठाकूर यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ अंजली करी उपस्थित होत्या. त्यांनी दुर्गां ना महिला स्वास्थ, आरोग्य विषयी माहिती मार्गदर्शन केले.

उद्घाटन सत्रास प्रमुख वक्ते म्हणून माननीय प्रांत सह मंत्री श्री. नितीन जी वाटकर यांनी दुर्गवाहिनी व स्त्री शक्ति चा इतिहास यावर माहिती दिली श्री. विजयराव देशपांडे, पश्चिम महाराष्ट्र प्रांत सदस्य व मातृशक्ती व दुर्गा वाहिनी प्रांत पालक हे ही उपस्थित होते. त्यानंतर शाखा लावण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने गणरचना, शिक्षका ओळख व विषयांची ओळख करून देण्यात आली. व गणानुसार विषयांना सुरुवात करण्यात आली. अध्ययन, शाखा लावणे शिकवले व भोजनानंतर मनोरंजन सत्र झाले.

दिवस दुसरा रविवार दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी, यांनी पहाटे प्रातःस्मरण व योग घेतले. त्यानंतर शाखा लावण्यात आली यामध्ये समता, नियुद्ध, छुरीका, व दंड यांचे प्रशिक्षण दिले.

त्यानंतर बौद्धिक सत्र झाले त्यानंतर चर्चासत्र अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करत प्रश्न उत्तरे यामध्ये पार पाडले, कृती सत्र – शक्ति साधना केंद्र, साप्ताहिक मिलन व बाल संस्कार केंद्र याबाबत कृती मधून वरील विषय समजावून सांगितले.

समारोपाच्या सत्राला सर्व दुर्गांच्या पालकांना वर्ग स्थानी आमंत्रीत करन्यात आले होते. समारोप सत्राला प्रमुख उपस्थिती, पश्चिम महाराष्ट्र प्रांतमंत्री, मा.श्री.किशोरजी चव्हाण, विभाग सह मंत्री श्री दिनेश जी लाड, दुर्गावाहिनी प्रांत सहसंयोजिका, सौ.आरतीताई भारती, शक्ती साधना केंद्र प्रांत प्रमुख, कु. समृद्धीताई सराफ, विभाग संयोजिका कु मुस्कान ताई वर्मा, जिल्हा उपाध्यक्षा सौ राखी ताई शहा. जिल्हा मंत्री, श्री. शार्दूल ठाकूर हे व्यासपीठावर उपस्थित होते. प्रथम सर्वांचे स्वागत करण्यात आले, त्यानंतर दीप प्रज्वलन व प्रतिमापूजन मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आले. त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र व विजय महामंत्र घेऊन समारोप सत्राची सुरुवात करण्यात आली.

मान्यवरांचा परिचय जिल्हा संयोजिका कु रचना ताई भागवत यांनी करून दिला. सर्व नवदुर्गांनी येथे शौर्य प्रशिक्षण वर्गामध्ये जे प्रशिक्षण घेतले. त्याबाबत प्रात्यक्षिक दाखवून उपस्थितांची मने जिंकली. उपस्थित पालक व अधिकारी वर्ग यांनी या प्रशिक्षण वर्गाबाबत समाधान व्यक्त केले. जिल्हा उपाध्यक्षा सौ राखी ताई शहा यांनी जिल्ह्यात चालू असलेल्या कामकाजाबाबत माहिती दिली. तसेच दुर्गा प्रशिक्षणार्थी काही दुर्गा व त्यांच्या पालकांनी वर्गाबाबत अनुभव कथन केले.

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री श्री. किशोरजी चव्हाण आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर जिल्हा मंत्री श्री शार्दूल ठाकूर यांनी जिल्हा प्रखंड स्तरावर दुर्गांच्या नियुक्ती जाहीर करून सर्व दुर्गांना कार्य करण्याकरिता शुभेच्छा दिल्या.

विशेष बाब म्हणजे या दीड दिवसीय शौर्य प्रशिक्षण वर्गामुळे दुर्गा वाहिनी जिल्हा टोळी पूर्ण झाली.त्याचबरोबर प्रखंड व खंड स्तरावर दुर्गाना नियुक्ती देण्यात आल्या. सदर वर्गास, दुर्गावाहिनी

सह संयोजिका सौ आरती ताई भारती, प्रांत शक्ती साधना केंद्र प्रांत प्रमुख कु. समृद्धीताई सराफ, विभाग संयोजिका कु. मुस्कान ताई वर्मा व जिल्हा दुर्गावाहिन सह संयोजिका, कु रचना ताई भागवत यांनी पूर्णवेळ उपस्थित राहून वर्ग यशस्वी रित्या घेतला.

जिल्हा उपाध्यक्षा सौ राखी ताई शहा, जिल्हा मंत्री श्री. शार्दूल ठाकूर, जिल्हा सहमंत्री ज्ञानेश्वर इंगळे, जिल्हा सहमंत्री श्री राजेंद्र देशपांडे सर्व प्रमुख व्यवस्था चे नियोजन लावून दिले, मातृ शक्ती जिल्हा संयोजिका सौ उल्का ताई सराळकर, प्रखंड संयोजिका माळवदकर ताई व वाघमारे ताई या मातृ शक्तींनी पूर्णवेळ दुर्गांसोबत निवासी राहून व्यवस्था सांभाळली.

बजरंग दल सह संयोजक श्री आशिष दुसाने, प्रखंड मंत्री श्री सुजित गुरव व श्री कुणाल जोशी यांनी बजरंगीना सोबत घेऊन निवास व्यवस्था बघितली. या शौर्य प्रशिक्षण वर्गाकरिता ज्या संस्था व व्यक्तींनी सहकार्य केले त्यांचे आभार मानून आलेल्या सर्व दुर्गांना शुभेच्छा देऊन या दीड दिवसीय वर्गाचा शांती मंत्र व राष्ट्रीय उद्घोष घेऊन समारोप करण्यात आला.

**जिल्हा मंत्री, श्री शार्दूल ठाकूर**



## शौर्य प्रशिक्षण वर्ग

सातारा दिनांक : ११/०१ /२०२६ विश्व हिंदू परिषद दुर्गा वाहिनी सातारा जिल्हा एक दिवसीय निवासी शौर्य प्रशिक्षण वर्ग २०२६

या वर्ग अंतर्गत ५० मुली सहभागी झाल्या त्यामध्ये मुलींना स्वसंरक्षण आणि सबलीकरण यासाठी विविध उपक्रम जसे नियुद्ध कला, दंड, छूरीका, रोड सेफ्टी याचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच धर्माचे शिक्षण कायद्याची सुरक्षितता आणि आरोग्याची काळजी याबद्दल त्या त्या क्षेत्रातील व्यक्तींकडून उद्बोधित करण्यात आले.



## विश्व हिंदू परिषद, बजरंग दल बार्शी प्रखंड सोलापूर जिल्ह्याच्या वतीने शौर्य संचलन

शौर्य संचलनाची सुरुवात सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास भगवंत मैदानावर भगवा ध्वजारोहण करून बजरंग दलाच्या प्रार्थनेने झाली.सदरच्या शौर्य संचलनाचा प्रारंभ भगवंत मैदान येथून महाद्वार चौक,वीर सावरकर चौक,पटेल चौक,ऐनापुरे मारुती चौक,आर.एस.एम.हाइट,मल्लाप्पा धनशेट्टी,शाहीर अमर शेख चौक,पांडे चौक,बार्शी नगरपरिषद,नरवीर तानाजी मालुसरे चौक,संकेश्वर उद्यान,एकवीराई चौक मार्गे भगवंत मंदिरात भगवंत मंदिरात शौर्य संचलनाच्या समारोप कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता व श्री प्रभु रामचंद्रांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली.त्यानंतर विश्व हिंदू परिषद सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार यांनी त्रिवार ओंकार मंत्र, एकात्मता मंत्र व विजय महामंत्र म्हणून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी सर्व मान्यवर पाहुण्यांचा परिचय विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र विभागाचे सहमंत्री विजयकुमार पिसे यांनी करून दिला. विश्व हिंदू परिषद,बजरंग दल बार्शी प्रखंड सोलापूर जिल्ह्याच्या वतीने प्रास्ताविक विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री बापूसाहेब कदम यांनी केले.त्यानंतर सर्व मान्यवरांना श्री प्रभु रामचंद्रांच्या प्रतिमा देवून सन्मानित करण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक शहरात,प्रत्येक गावागावात व शेवटच्या वाड्यावस्त्यांवर विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी प्रवास करुन त्या त्या ठिकाणी अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणात शौर्य संचलने काढण्यासाठी प्रयत्न करावेतअसे मत, विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्राचे प्रांताध्यक्ष प्रा.गजानन धरणे सर यांनी व्यक्त केले.

यापुढील काळात विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या भागात बांगलादेशी किंवा रोह्यंग्ये रहात असतील तर त्यांना आपल्या देशातून हुसकावून लावण्यासाठी तात्काळ याबाबतची माहिती प्रांताला द्यावी.तसेच आपल्या भागात विश्व हिंदू परिषदेचे बलस्थाने वाढविण्यासाठी प्रयत्न करुन जास्तीत

जास्त शौर्य संचलने प्रत्येक भागात काढण्यासाठी सामुहिक महाआरत्याच्या माध्यमातून बहुसंख्येने हिंदू बांधवांना एकत्रित करु या असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांनी केले.

लव जिहाद, धर्मांतरण व मुस्लिम वोट बँकेच्या जिहाद्यांना धडा शिकविण्यासाठी युवकांनी विश्व हिंदू परिषदेच्या बजरंग दलामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बजरंग दलाचे राष्ट्रीय सह संयोजक विवेक कुलकर्णी यांनी केले.

या कार्यक्रमास पश्चिम महाराष्ट्र विश्व हिंदू परिषद चे प्रांताध्यक्ष प्रा.गजानन धरणे सर, प्रांत मंत्री किशोर चव्हाण,बजरंग दलाचे राष्ट्रीय सह संयोजक विवेक कुलकर्णी,पश्चिम महाराष्ट्र बजरंग दलाचे प्रांत सह संयोजक संदेश भेगडे,विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे धर्माचार्य संपर्क प्रांत सह प्रमुख नागनाथ बोंगरगे, विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र विभागाचे सहमंत्री विजयकुमार पिसे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह ऋषीकेश कुलकर्णी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सुरेश हालमे, जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार, जिल्हा सहमंत्री विष्णू जगताप, अक्कलकोट प्रखंडाचे मंत्री मेजर बालाजी राजपूत, भगवंत मंदिर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त मुकुंदराव कुलकर्णी, सतीश अरगडे, बजरंग दलाचे प्रविण जिल्ला, अभय कुलथे, अमित गाडगी उपस्थित होते. शौर्य संचलनात सुमारे पाचशे बजरंग दलाच्या बजरंगी चा समावेश. शौर्य संचलना पुढील बजरंगी च्या हातातील भगवा ध्वज सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

शिस्तबद्ध शौर्य संचलन पाहण्यासाठी नागरिकांनी रस्त्याच्या कडेला दुतर्फा रांगा केल्या होत्या. शहरातील चौकाचौकात नागरिकांनी व व्यापारी बांधवांनी मोठ्या प्रमाणात पुष्पवृष्टी केली.शौर्य संचलनासमोर रिक्षाच्या समोरील बाजूस लावलेली भारतमातेची प्रतिमा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. तसेच टेम्पो वरील साऊंड सिस्टीम वर देशभक्तीपर गीतांनी अस्मान दुमदुमून गेला. तब्बल एक तास,सुमारे पाच कि.मी.चे अंतर शौर्य संचलनात पायी चालत कार्तिक वाघ या चिमुकल्या बजरंगी ने वेधले सर्वांचे लक्ष.

शहरात कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून शौर्य संचलनाच्या मार्गावर तगडा बंदोबस्त पोलिस प्रशासनाने लावला होता. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री बापूसाहेब कदम, प्रखंड मंत्री अमर शुक्ला, सहमंत्री गोविंद शिंदे,बजरंग दलाचे प्रखंड संयोजक शिरीष जाधव,प्रखंड प्रचार प्रसार प्रमुख ऋषीकेश भुजबळ यांनी अधिक परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विजयकुमार पिसे यांनी केले तर आभार जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार यांनी मानले.

सायंकाळी आठ च्या सुमारास भगवंताच्या महाआरती व महाप्रसादाने शौर्य संचलनाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

## श्री परमपूज्य सदगुरु ईश्वर बुवा रामदासी उर्फ दादा महाराज पाटोळे यांचा संत प्रवास

दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी कसबा जिल्ह्यातील महात्मा फुले प्रखंड मधील संवेदनशील भाग लोहयानगर येथे श्री परमपूज्य सदगुरु ईश्वर बुवा रामदासी उर्फ दादा महाराज पाटोळे यांचा संत प्रवास त्रिवार मंत्र विजय मंत्र याने सुरुवात करत संपन्न झाला. यावेळेस वसाहतीतील महिलांनी महाराजांचे चरण जल अर्पण करून पुष्प हार अर्पण करत अवशन केले.

महाराजांच्या हस्ते म्हसोबा देवाची आरती घेण्यात आली. आरती झाल्यावरती छोटासा कार्यक्रम घेण्यात आला आहे या कार्यक्रमात महाराजांनी मातंग समाजाच्या इतिहासावरती उजाळा दिल्या मातंग समाज शूर व मंगल कसा आहे इतिहासात मातंग समाजातील देव महान संत ऋषिमुनी यांच्या विषयी दुर्मिळ असलेली ऐतिहासिक माहिती अतिशय सुक्ष्म रूपात पुराव्या सहित समाजामध्ये सादर केली.

यावेळेस महाराजांचे स्वागत क्रांतिवीर सेनेचे अध्यक्ष श्री मनोज आप्पा शिरसागर व प्रवीण क्षीरसागर तेजस माने अभिषेक गोळे मूर्ती दाढे यांनी हार पुष्प देऊन सकल मातंग समाजातर्फे त्यांचे स्वागत केले महाराजांच्या वाणीतून निघणारे शब्द समाजातील बंधू-भगिनींना स्तब्ध करून सोडणारे होते महाराजांनी त्यांच्या पाऊण तासाच्या व्याख्याना मध्ये मातंग समाजाच्या प्राचीन काळा पासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्या क्रांती ग्रुप लहुजी वस्ताद साळवे ते अण्णाभाऊ साठे पर्यंतच्या इतिहास आपल्या वाणीतून समाजातील बंधू भगिनींना सांगितला यावेळेस हा इतिहास ऐकत असलेले समाज बंधू भगिनी स्तब्ध होऊन व अंगावर शाहरे निर्माण करणा इतिहास महाराजांच्या मुखातून एकताना वातावरण अधिक गंभीर झालते प्रत्येक जण महाराजांचे शब्द गांभीर्याने ऐकत होते महाराजांनी अतिशय साध्या आणि सोप्या भाषेत मातंग समाजाचा इतिहास मांडला यावेळेस महाराजांच्या हस्ते धर्म रक्षा सूत्र सिद्ध करून समाजातील बांधवांना बांधण्यात आले महाराजांनी सर्वांसोबत भोजनाचा आनंद घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले प्रखंडा तील धर्मप्रसार सदस्य प्रकाश पवार कुणाल, हराडे दीपक साठे, मूर्ती दाढे यांनी केले होते.

रेशमाताई लोंढे, स्वातीताई बागवे सचिन बागवे यांनी भोजनाची व्यवस्था केली होती. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थित म्हणून कसबा जिल्हा मंत्री विजय कांबळे धर्म प्रसार प्रमुख पुणे श्री अमरजी सातपुते हे उपस्थित होते.

**प्रकाश पवार, धर्मप्रसार आयाम सदस्य महात्मा फुले प्रखंड**



## दुर्गा वाहिनी शौर्य प्रशिक्षण अभ्यास वर्ग

शनिवार दिनांक २० डिसेंबर २०२५ वेळ सायंकाळी ५.०० वाजल्यापासून दुर्गा वाहिनी शौर्य प्रशिक्षण अभ्यास वर्गाची सुरुवात झाली. सौ. आरती ताई, सौ. कार्तिकी ताई यांच्या हस्ते दीप प्रज्वलित व भारत माता राम दरबारच्या प्रथिमेश पुष्प अर्पण करण्यात आले. परिपाठी गीत यांनी अभ्यास वर्गाची सुरुवात झाली. अभ्यास वर्ग पर्वती जिल्हा व कसबा जिल्हा या दोन्ही जिल्ह्यांनी संयुक्तपणे केला. या अभ्यास वर्गामध्ये ८१ दुर्गांनी सहभाग घेतला. ४५ दुर्गा कसबा जिल्ह्यातून पाच प्रकरणातून आल्या होत्या व पर्वती जिल्ह्यातून ३६ दुर्गांनी सहभाग घेतला होता. शिक्षिका म्हणून दहा शिष्यवृत्ती शिक्षकांनी सहभाग घेतला.

अभ्यास वर्गाची सुरुवात स्वागत उद्घाटनने झाल्यानंतर मैदानावर शारीरिक प्रशिक्षण म्हणून सुरीशा, मुलींचे खेळ, लाठी काठी, कराटे दुर्गांकडून प्रशिक्षण सराव करून घेण्यात आले. नंतर भोजन घेऊन झाल्यावरती रात्री ९.०० वाजता सत्संग घेण्यात आला. सत्संग झाल्यानंतर पहिल्या अर्ध्या दिवसाचा अभ्यास वर्ग संपन्न झाला.

रविवार २५ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ५.०० वाजता प्रातःस्मराणी अभ्यास वर्गाची पुन्हा सुरुवात झाली. यावेळेस प्रातःस्मरण, मैदानावरील शाखा, जलपान घेऊन बौद्धिक वर्गाला सुरुवात झाली. प्रथम बौद्धिक वर्ग सौ. सोनाली ताई नाथ महाराष्ट्र प्रांत दुर्गा वाहिनी संयोजिका व आरती ताई भारती महाराष्ट्र प्रांत सह संयोजिका यांनी बौद्धिक सत्र घेतले. दुपारी भोजनानंतर पुन्हा मैदानावरती शाखा आयोजित करून शारीरिक खेळ, सुरीक्षा काठी लाठी कराटे चे प्रशिक्षण देण्यात आले. दुपारी चहापान झाला.

दुर्गा वाहिनी शौर्य प्रशिक्षण वर्गाची सांगता सौ. सोनाली नाथ, आरती ताई भारती कार्तिक परदेशी पर्वती जिल्हा मंत्री नाना शिरसागर पर्वत जिल्हा अध्यक्ष तुळशीराम उणेचा कसबा जिल्हा मंत्री विजय कांबळे यांच्या व्याख्याने व दुर्गांच्या पालकांसमोर दुर्गांनी प्रत्यक्ष करून वंदे मातरम शांति मंत्राने जय घोष करत सायंकाळी ७.०० वाजतावर्गाची सांगता करण्यात आली.

दुर्गा वाहिनी शौर्य प्रशिक्षण अभ्यास वर्ग काही वा. दि. वैद्य शाळा एस. पी कॉलेज सदाशिव पेठ पुणे येथे होता. सदर अभ्यास वर्गाला कसबा जिल्ह्यातील विजय कांबळे, कसबा जिल्हा मंत्री श्री सुनील भडकवाडी, निलेशजी कांबळे सह जिल्हा मंत्री प्रकाश पवार गोपाळ शिंदे, शैलेश जाधव व पर्वती जिल्ह्यातील अध्यक्ष तुळशीराम उणेचा, जिल्हा मंत्री नाना क्षीरसागर, सह मंत्री महेंद्र सिंग चौहान, सह संयोजक अनिकेत मिसाळ, समरसता प्रमुख राजाभाऊ परदेशी, प्रखंड मंत्री शंकर रसाळ, प्रखंड संयोजक सुमित शिंदे, अनिकेत पांचाळव त्यांची इतर टीम अभ्यास वर्गाची व्यवस्था यांनी पार पाडली. अभ्यास वर्गाला एकूण दहा शिक्षकांनी मुस्कान वर्मा ताई, आरती भारती ताई, कार्तिकी परदेशी ताई, सुप्रिया मुजुमदार ताई, खुशी शेंडेताई, अनुष्का परदेशी ताई, अनुष्का पाटोळे, सानिका व्यवहारे, सानिया चव्हाण शिष्य दुर्गांना प्रशिक्षण देण्यात आले.

**श्री नाना क्षिरसागर, पर्वती जिल्हा मंत्री**

**श्री विजय कांबळे, कसबा जिल्हा मंत्री**




गंगाधाम येथे सुरू असलेल्या, गौ कथा या कार्यक्रमाला मातृशक्तींनी भेट देऊन, साध्वी कपिला दीदी गोपाल सरस्वती यांच्या सोबत कार्याविषयी चर्चा करण्यात आली.




नवीन वर्षाच्या दैनंदिनीचे प्रकाशन करताना वि. हिं. प. पदाधिकारी






## भव्य रक्तदान शिबिर शनिपार पुणे

रविवार दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी शनिपार कवटी अड्डा पुणे येथे बजरंग दलाच्या मार्फत श्रीराम जन्मभूमी आंदोलनात हुतात्मा झालेले कार सेवक श्री कोठारी बंधू गुरु गोविंद सिंग ज्यांच्या चार पुत्रांच्या स्मरण व संघ शताब्दीच्या निमित्त भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले या शिबिराला स्थानिक हिंदूवादी सामाजिक कार्यकर्त्या सौ येनपुरे व शनिपार मित्र मंडळाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी भारत मातेची पुजन पुष्प अर्पण करून व दीप प्रज्वलित करून रक्तदान शिबिराची सुरुवात केली.

यावेळेस कसबा जिल्हा भागातील अनेक सामाजिक कार्यकर्ते यांनी शिबिराला भेट दिली हिंदूवादी नेते अभि भाऊ वाघचौरे प्रखंडातील व पुणे शहरातील अनेक कार्यकर्त्यांनी शिबिराला भेट दिली शिबिरात एकूण साठ रक्तदान पिशव्या नागरिकांमार्फत रक्त संचलन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन विक्रमजी घुंगरू वाले बजरंग दल संयोजक कसबा भाग दिपुल इनामदार बजरंग दल सह संयोजक आकाश चव्हाण बजरंग दल सहसंयोजक प्रतीकची बोबडे गोरक्षा प्रमुख किरण परदेशी सुरक्षा प्रमुख यांनी आयोजन केले होते

भीष्म पिता म्हणून श्री धनंजय राव गायकवाड पूर्व विभाग मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली बजरंग दलाच्या भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. सहदेव सुध्देकर महात्मा फुले प्रखंड मंत्री, श्रीनिवास कोळी महात्मा फुले बजरंग दल संयोजक, आकाश कोळी महात्मा फुले प्रखंड बजरंग दल सहसंयोजक, विद्युत पिल्ले, देवांश यादव, केतन खुडे, शुभम सोनवणे यांनी छोट्या-मोठ्या कार्यक्रमाच्या व्यवस्था पार पडल्या.

**सोमनाथ शुद्धेलकर, महात्मा फुले प्रखंड मंत्री**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जिल्हा धाराशिव तर्फे पत्रकार सत्कार समारंभ दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाच्या प्रसंगी १५ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.त्याच कार्यक्रमात श्री भास्कर ब्रह्मनाथकर लिखित 'आणीबाणीचे ते दिवस' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री देविदासजी पाठक यांनी केले. तसेच संघाची पत्रकारांचा सत्कार करण्याविषयीची भूमिका व संघाचा विचार श्री अजयजी जानराव यांनी मांडला.

याप्रसंगी भास्कर ब्रम्हनाथकर यांनी पुस्तकाविषयीची माहिती सांगताना इंदिरा गांधींनी स्वतःची खुर्ची टेकविण्यासाठी कशाप्रकारे आणीबाणी आणली व लोकशाहीची हत्या करून लक्षावधी लोकांना विना चौकशी तुरुंगात टाकून त्यांचे हाल केले. संघावर बंदी आणली. ब्रिटिशांनाही लाजवतील अशा प्रकारचे अत्याचार सत्याग्रहींच्यावर केले. लोकशाहीची हत्या इंदिरा गांधींनी कशी केली. याविषयीची माहिती सांगितली. श्री रणदिवे यांनी आपल्या पत्रकारितेचे काही अनुभव सांगितले. तसेच चौगुले यांनी वारकरी संप्रदायाची आवश्यकता व त्याद्वारे व्यसनमुक्त समाज करण्याचे काम कसे होत आहे याविषयीची माहिती सांगितली. सगळ्यात शेवटी जिल्हा कार्य अजयजी जानराव यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी घेतलेल्या छायाचित्रात, जिल्हा कार्यवाह श्री अजयजी जानराव, पुस्तकाचे लेखक भास्कर ब्रम्हनाथकर, पत्रकार श्री रणदिवे, हरिभक्ती परायण विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते श्री चौगुले, पत्रकार श्री देविदासजी पाठक दिसत आहेत. या कार्यक्रमात पत्रकार व जनतेने भरपूर प्रतिसाद दिला.




## समाजात सत्व टिकवून ठेवणे ही आपलीच जबाबदारी : केंद्रीय सह मंत्री अरुण नेटके

पुणे – (दि. १८ जानेवारी) शुद्ध आणि सात्विक सद्भाव हा विहिंप कार्याचा पाया असून त्याद्वारे समाजातील सत्व टिकवून ठेवणे ही आपलीच जबाबदारी आहे. त्यामुळे पूर्ण समाज सुरक्षित राहील असा महत्त्वाचा संदेश विहिंप अखिल भारतीय मंदिर अर्चक पुरोहित आयाम प्रमुख व केंद्रीय सह मंत्री मा. अरुणजी नेटके यांनी दिला. प्रांत व्यापक बैठकीमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. आपले कार्य खंड, प्रखंड स्तरावर नेणे किती आवश्यक आहे आणि त्यासाठी कार्यकर्ता कसा असावा हेही त्यांनी गीतेतील एका श्लोकाचे उदाहरण देऊन सांगितले. बैठक नवीन मराठी शाळेचे सभागृह येथे आयोजित करण्यात आली. यावेळी क्षेत्र मंत्री रामचन्द रामुका, क्षेत्र धर्मप्रसार प्रमुख अजय निदलावार, प्रांत अध्यक्ष प्रा. गजानन धरणे, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, पांडूरग राऊत, हेमंत हरहरे सौ. माधवी सौंशी, ॲड. सतिश गोरडे व नितीन वाटकर आदि उपस्थित होते. तसेच सर्व आयामांचे प्रांत प्रमुख, विभाग व जिल्हा मंत्री, तसेच जिल्हा संच पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

नवनियुक्त प्रांत अध्यक्ष प्राचार्य गजानन धरणे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विहिंपतील सर्व आयाम, रचना आणि कार्यपद्धती पाहून समाधान वाटल्याचे सांगितले. सध्या अनेक प्रश्न समाजामध्ये आहेत, या सगळ्यावर उपाय कोण शोधणार हा प्रश्न आहे, पण आपले संघटन हेच त्यावर उत्तर आहे! असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नियमित प्रशिक्षणाचे अधोरेखित करून आपणही आगामी प्रशिक्षण वर्गामध्ये उपस्थित राहायचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. माजी प्रांत अध्यक्ष पांडुरंग राऊत यांनी आपला संघ स्वयंसेवक म्हणून सुरू झालेला बालपणापासूनचा प्रवास उलगडून दाखवला.

प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांनी हस्तिनापूर येथे झालेल्या केंद्रीय बैठकीतील वृत्त महत्त्वाचे निर्णय आणि आगामी कार्यक्रम याबद्दल माहिती सांगितली. अरुण नेटके यांनी आगामी रामोत्सव कार्यक्रमाचे स्वरूप कसे असावे याबद्दलही मोलाचे मार्गदर्शन केले. भव्य शोभायात्रा समाजालाच काढू द्याव्यात, आपण रामोत्सव जास्त प्रमाणात ग्राम व वस्तीस्तरावर साजरा कसा होईल याकडे जास्त लक्ष द्यावे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्याकारीणी सदस्य व पालक हेमंत हरहरे यांनी संघशताब्दी निमित्त होणारे गृहसंवाद व हिंदू संमेलने व आगामी कार्यक्रम आणि त्यामध्ये आपला सहभाग कसा असावा यासंबंधी मार्गदर्शन केले. प्रांतातील विविध आयामांद्वारे संघटन आणि आगामी कार्य नियोजन यासंबंधी वृत्त निवेदन करण्यात आले. सर्व विभाग मंत्र्यांनीही विभागश: बैठकांनंतर आपापल्या विभागातील जिल्ह्यांचा संख्यात्मक आढावा सादर केला.

मुंबई क्षेत्र मंत्री रामचंद्र रामुका यांनी केंद्रीय बैठकीत मान्य झालेले ठरावांची माहिती दिली, प्रांत सह मंत्री ड सतिश गोरडे यांनी परिषद क्षेत्र वर्ग, प्रांत संयोजक नितीन महाजन यांनी बजरंग शौर्य प्रशिक्षण वर्ग, प्रिया रसाळ यांनी मातृशक्ती वर्ग, सौ सोनाली नाथ यांनी दुर्गा वाहिनी वर्ग व श्रीकांत पोतनीस यांनी विशेष संपर्क आयामाची माहिती दिली. मुंबई क्षेत्र धर्मप्रसार प्रमुख मा. श्री. अजयजी निलदावार हेही प्रांत बैठकीमध्ये उपस्थित होते. नवीन वर्षाच्या दैनंदिनीचे सर्व उपस्थित मान्यवर ॲड. ललित झुनझुनवाला यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. मातृशक्ती प्रांत संयोजिका सौ प्रियाताई रसाळ यांनी आचारपद्धती, विभाग सहमंत्री श्री. संतोष अनगोळकर यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रार्थनेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.




**मा. पांडुरंग अण्णा राऊत आणि मा. गजानन धरणे यांचा प्रांत बैठकीत सन्मान करण्यात आला.**

## हिंदू तरुणांना बलवान व नशामुक्त बनवण्याचे ध्येय बजरंग दलाचे...

### किशोर चव्हाण प्रांत मंत्री



रविवार दिनांक २८ डिसेंबर रोजी विश्व हिंदू परिषद बजरंग दल पर्वती भागातर्फे बजरंग दल शौर्य संचलनाचे आयोजन करण्यात आले होते.

सह्याद्री मैदान पर्वती पायथा येथून संचलनास सुरुवात झाली लक्ष्मीनगर, पंचमी चौक, पर्वती दर्शन, आंबेडकर वसाहत या भागातून हे संचलन गेले. बजरंग दलाचे जवळपास ३०० कार्यकर्ते या संचलनात सहभागी झाले होते.

ठिकठिकाणी फटाके वाजून, रांगोळी काढून, पुष्पवृष्टी करून संचलनाचे स्वागत करण्यात आले. जय श्रीराम, देश का बल बजरंग दल, अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सर्वत्र भगवे वातावरण निर्माण झाले होते. समापन पुन्हा सह्याद्री मैदान येथे झाले. यावेळेस प्रास्ताविक जिल्हा मंत्री नाना क्षीरसागर यांनी केले. विश्व हिंदू परिषदेचे प्रांत मंत्री किशोरजी चव्हाण यांनी बोलताना वरील उदगार काढले. तसेच बजरंग दलाने रामजन्मभूमी मुक्त करण्याचे केलेले काम, बुढा अमरनाथ यात्रा पुन्हा सुरू करणे, गोरक्षण करणे, लव्ह जिहाद, लँड जिहाद यासारख्या यासारख्या घटनावर सातत्याने चालू असलेले काम यांचा उल्लेख केला.

या प्रसंगी जिल्हा अध्यक्ष तुळशीराम उणेचा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाह दर्शन जी मिरासदार, सह कार्यवाह महेश दाबी, भारतीय जनता पार्टी पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, विश्व हिंदू परिषद जिल्हा सह मंत्री महेंद्र सिंग चौहान, बजरंग दल सह संयोजक विनायक देसाई, अनिकेत मिसाळ सुमित शिंदे, देवव्रत कसबे, अजय गायकवाड, किरण विरोळे अनिकेत पांचाळ राजाभाऊ परदेशी उपस्थित होते. सूत्रसंचलन दुर्गा वाहिनी सह संयोजिका अक्षता चिल्लाल यांनी केले.



## गुरू गोविंदसिह यांच्यामुळे सनातन धर्म अस्तित्वात राहिला! -विजयजीत सिंह वालिया

पुणे (दिनांक : २१ जानेवारी २०२६) 'गुरू गोविंदसिंह यांच्यामुळे सनातन हिंदुधर्म अस्तित्वात राहिला!' असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सदस्य विशेष संपर्क विभाग विजयजीत सिंह वालिया यांनी विश्व हिंदू परिषद सभागृह, पुणे येथे मंगळवार, दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी केले. विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे वतीने शीख बंधू समागम आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून वालिया बोलत होते. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्र धर्मप्रसार प्रमुख अजय निलदावार, लष्कर गुरुद्वारा प्रमुख चरणजीतसिंह सहानी, गुरुमुखसिंह गुरुनानी, हिंदू आध्यात्मिक सेवा संघ कोषाध्यक्ष गुरुबितसिंग मखिया, मनजितसिंह सेठी, नरेंद्र सिंह बक्षी, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती; तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची सभागृहात उपस्थिती होती.

विजयजीत सिंह वालिया पुढे म्हणाले की, 'देशात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील प्रत्येक लढ्यात शीख समाजाने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. गुरू तेगबहादूरसिंह यांनी धर्मासाठी बलिदान दिले. ज्या औरंगजेबाने त्यांचा शिरच्छेद केला त्याची कबर आज उपेक्षित अवस्थेत आहे; तर तेगबहादूरसिंह यांच्या समाधीपाशी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. त्या ठिकाणी भाविकांसाठी चोवीस तास लंगर (भोजनसेवा) चालविले जाते. सद्यःस्थितीत शीख समाजाने आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी एकत्रित येऊन सुरक्षित भविष्यासाठी योजना आखली पाहिजे!' असे आवाहन त्यांनी केले. अजय निलदावार यांनी प्रास्ताविकात विश्व हिंदू परिषदेची स्थापना, उद्देश व भूमिका विशद केली. किशोर चव्हाण यांनी मान्यवरांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. मुकुंद सिंग, विलास फाटक, संजय हसिंजा, शैलेंद्र जाधव, मनोज शेलार, हृषीकेश सपाटे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे यांनी आभार मानले.

# ।। श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ।।

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि; श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे – ४१२२०७

कारखाना साईट : EXABX No. ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

* १० MW क्षमतेचा पॉवर प्लँट
* ४५०० TCD ऊस गाळप क्षमता
* ८० KLPD क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
* १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा CNG प्रकल्प
* ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
* शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
* ३ KLPD क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती (2G R & D) प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## – मुख्य कार्यालय –

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# चांगल्या बातम्या

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित् वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

१) ९ डिसेंबर रोजी जगातील आय् टी क्षेत्रांतील ३ मोठ्या कंपन्यांच्या प्रमुखांनी, एकापाठोपाठ एक अशी, आपले पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांची दिल्लीत भेट घेतली. चर्चेअंती मायक्रोसॉफ्ट चे सीईओ श्री नाडेला यांनी सांगितले, की मायक्रोसॉफ्ट कंपनी अजून १७.५ बिलियन डॉलर ची गुंतवणूक, पुढील ४ वर्षात, भारतात करणार आहे.

अगोदर जाहीर केलेल्या ३ बिलियन डॉलर सह एकूण गुंतवणूक २०.५ बिलियन डॉलर (१ लाख ८० हजार कोटी रुपये) असेल. त्या पाठोपाठ गुगलने जाहीर केले की गुगल १५ बिलियन डॉलर ची गुंतवणूक येत्या ५ वर्षात भारतात करणार आहे. त्यानंतर मेझॉन ने सांगितले की ते २०३० पर्यंत ३५ बिलियन डॉलर ची गुंतवणूक भारतात करतील.

ही सर्व गुंतवणूक ए आय, क्लाऊड, डेटा सेंटर वगैरे मध्ये असेल. त्या पाठोपाठ कॉग्निजंट आणि इंटेल च्या वरिष्ठांनी पंतप्रधानांची भेट घेऊन, ते ही भारतात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणार असल्याचे सांगितले. इंटेलने टाटा इलेक्ट्रॉनिक्स बरोबर करार केला असून प्रगत सेमीकंडक्टर चे उत्पादन भारतात केले जाणार आहे.

२) दक्षिण कोरियातील मोठी जहाज बांधणी कंपनीने (एच् डी ह्युंदाई ने) ७ डिसेंबर रोजी जाहीर केले की त्यांनी तामिळनाडू सरकार बरोबर २०० कोटी डॉलर (२,००० कोटी रुपये) गुंतवणूकीचा जहाज बांधणी व जहाज दुरुस्तीचा कारखाना उभा करायचा करार केला आहे. कोरिया बाहेर कंपनीचा हा पहिलाच कारखाना आहे. टप्प्याटप्प्याने कंपनी एकूण गुंतवणूक २०,००० कोटी रुपयांची करणार आहेत.

या अगोदर जुलै मध्ये त्यांनी कोचीन शिपयार्ड कंपनी बरोबर तेथील जहाजांचे डिझाईन, व उत्पादन वाढविण्यासाठी करार केला. तसेच सरकारी पब्लिक सेक्टर कंपनी BEML बरोबर बंदरावर वापरल्या जाणाऱ्या मोठ्या क्रेन, भारतात बनवण्याचा करार केला. आतापर्यंत या सर्व क्रेन परदेशातून आयात केल्या जात होत्या.

केंद्र सरकारने २०४७ पर्यंत जहाज बांधणी क्षेत्रात, जगातील पहिल्या ५ देशात भारताला आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यादृष्टीने हा करार महत्वाचा आहे.

३) फेब्रुवारी २०२० मध्ये अमेरिकेच्या लॉकहिड मार्टिन कंपनी बरोबर २४ हेलिकॉप्टर MH-60R पुरवण्याच्या करार झाला होता. त्यापैकी २० हेलिकॉप्टर्स आतापर्यंत भारतीय नौदलाला मिळाली. ही जगातील सर्वोत्तम लढाऊ हेलिकॉप्टर्स आहेत.

डिसेंबरच्या सुरुवातीस भारत सरकारने या हेलिकॉप्टरच्या मेंटेनन्स, पार्ट्स पुरवठा, इन्स्पेक्शन वगैरे चा ५ वर्षांसाठीचा ७,९९५ कोटी रुपयांचा करार लॉकहीड मार्टिन कंपनी बरोबर केला. यामुळे या हेलिकॉप्टरची व अन्य देशांतीलही हेलिकॉप्टर्सची देखभाल, दुरुस्ती भारतात होईल. तसेच भारतातील कंपन्याना पुरवठा व सर्विस चे काम व तंत्रज्ञान मिळेल.

४) २०४७ सालापर्यंत १०० गिगॅवॉट आण्विक ऊर्जा बनवण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. त्या अनुषंगाने १८ डिसेंबर रोजी संसदेत शांती बिल मंजूर झाले . यामुळे आण्विक ऊर्जा निर्मितीसाठी खाजगी तसेच परदेशी उद्योजक या क्षेत्रात सहभागी होऊ शकतील. नवीन तंत्रज्ञान येईल. भारताने कारखान्यात बनणाऱ्या मध्यम आकाराच्या अणुभट्ट्या विकसित केल्या आहेत. त्यामुळे अणुविद्युत प्रकल्प लवकर उभे होतील.तसेच युरेनियम ऐवजी समुद्र किनाऱ्यावरील वाळूतील थोरियम पासून युरेनियम २३३ मिळवून त्यावर चालणाऱ्या अणुभट्ट्या बनवण्याची तयारी केली जात आहे. कारण आपल्याकडे फारसे युरेनियम उपलब्ध नाही. पण थोरियमचा साठा मात्र जगात असणाऱ्या एकूण थोरियम च्या २५% टक्के साठा आपल्याकडे आहे. तामिळनाडूतील कल्पकम् येथे भवानी प्रकल्पाअंतर्गत ५०० मेगॅवॉटच्या २ अणुभट्ट्या, ज्या थोरियम पासून युरेनियम २३३ बनवून त्यावर चालतील, अशा उभ्या केल्या जात आहेत.

५) १५ डिसेंबर रोजी C-Dac ने बनवलेल्या १.० GHz ६४ बिट- ड्युअल कोअर मायक्रोप्रोसेसर ध्रुव ६४ चे उद्घाटन झाले. भारतामध्ये मायक्रोप्रोसेसर चे मोठे मार्केट आहे. व जगात बनवलेल्या एकूण मायक्रोप्रोसेसर पैकी जवळपास २५% मायक्रोप्रोसेसर हे भारतात वापरले जातात. आजवर हे मायक्रोप्रोसेसर आयात केले जात होते.

मायक्रोप्रोसेसर हे सध्याच्या आधुनिक इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसेसचा (जसे मोबाईल, कॉम्प्युटर, सॅटलाईटस्, संरक्षण सामुग्री वगैरे) मेंदू समजला जातो. सी-डॅक हे यापुढील प्रगत मायक्रोप्रोसेसर धनुष्य व धनुष्य+ बनवत आहेत. त्यामुळे भारत हा आपल्या गरजेसाठी तसेच जगाला पुरवण्यासाठी मायक्रोप्रोसेसर निर्मितीत सज्ज होत आहे.

६) मोहोली (पंजाब) येथे सरकारी पब्लिक सेक्टर मधील एकमेव कंपनी सेमी कण्डक्टर लॅबोरेटरी ही ४,५०० कोटी गुंतवणूक करुन उभी केली जात आहे. येथे वेफर फॅब्रिकेशन प्लांट उभारला जाणार असून चिप बनवण्यात ही कंपनी अग्रेसर राहील. येथील प्रकल्प उभारणीच्या कामासाठी नुकत्याच तीन कंपन्या निवडल्या गेल्या आहेत. ज्या मध्ये टाटा सेमिकंडक्टर चा मोठा वाटा (५० ते ५५%) आहे. ८ इंच वेफर चिप फॅब्रिकेशन प्लांट ची उभारणी त्यांच्या कडे असेल. दुसरे पॅकेज हैद्राबाद येथील Cyient या कंपनीला, तर तिसरे सिंगापूर येथील अप्लाइड मेटल्स ला मिळाले. पुढील ३० महिन्यात हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहे.

७) १० डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या युनेस्को च्या आंतरसरकारी समितीच्या २० व्या अधिवेशनात, भारतीय प्रकाशोत्सव असलेल्या दीपावली (दिवाळी) ला युनेस्कोच्या मानवतेच्या अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या यादीत समाविष्ट करण्यात आले. सामाजिक एकता मजबूत करणारी आणि उदारता आणि आशा यासारख्या मूल्यांना प्रोत्साहन देणारी, एक जिवंत परंपरा म्हणून दीपावली ला मान्यता देण्यात आली. यामध्ये कुटुंबे, कारागिर आणि जगात भारताबाहेर असलेल्या भारतीय लोकांच्या पाठिंब्याचा, व हस्तकला, विधी आणि सामुदायिक कार्यक्रमांचा समावेश आहे.

८) २७ ऑगस्ट रोजी अमेरिकेने भारतीय मालावर ५०% आयात कर लावला. त्यामुळे पहिले दोन महिने भारताच्या अमेरिकेतील निर्यातीवर परिणाम झाला. पण नोव्हेंबर २५ मध्ये मात्र भारताची अमेरिकेला होणारी निर्यात नोव्हेंबर २४ च्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर म्हणजे २२.६१% वाढली व निर्यात ६.९८ बिलियन डॉलर झाली. तसेच एप्रिल ते नोव्हेंबर या ८ महिन्यातील निर्यातही मागील वर्षी पेक्षा ११.३८% वाढून एकूण ५९.०४ बिलियन डॉलर (५,३४,६०० कोटी रुपये) झाली. इंजिनिअरिंग सामानाची निर्यातही नोव्हेंबर २५ मध्ये मागील वर्षी पेक्षा ७६.११% वाढून ३३०.६२ मिलियन डॉलर झाली.

अमेरिकेप्रमाणे चीनला होणारी निर्यातही नोव्हेंबर २४ च्या तुलनेत नोव्हेंबर २५ मध्ये ९८.१२% वाढून २.२ बिलियन डॉलर झाली. तर एप्रिल ते नोव्हेंबर पर्यंत ची निर्यात ही ३२.८३% वाढून १२.२२ बिलियन डॉलर झाली. ही वाढ विशेष करून इंजिनिअरिंग व इलेक्ट्रॉनिक सामानांच्या निर्यातीत झाली. याचबरोबर नोव्हेंबर २५ मध्ये सोने, तेल व कोळसा याची आयात कमी झाली. त्यामुळे नोव्हेंबर २५ मधील इंजिनिअरिंग सामानाच्या आयात व निर्यात यातील तूट गेल्या ५ महिन्यात सर्वात कमी (म्हणजे २४.५३ बिलियन डॉलर) झाली.

नोव्हेंबर २५ मध्ये सर्व्हिसेस ची निर्यात ३५.८६ बिलियन डॉलर झाली. तर आयात १७.९६ बिलियन डॉलर झाली. त्यामुळे निर्यात ही आयातीपेक्षा १७.९ बिलियन डॉलरने (१,६१,१०० कोटी रुपयांनी) जास्त झाली.

९) सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवडून आलेले आपले मा. नरेंद्रजी मोदी हे जगातील सर्वात लोकप्रिय व्यक्ती ठरले आहेत. गेल्या ११ वर्षात त्यांना २९ देशांनी त्यांच्या देशातील सर्वोत्कृष्ट बहुमान देऊन त्यांचा सत्कार केला आहे.

२०१४ साली पंतप्रधान झाल्यावर त्यांना २०१६ मध्ये २, २०१८ मध्ये २, तर २०१९-४, २०२१-१, २०२३-६, २०२४-४ आणि २०२५ मध्ये आतापर्यंत १० देशांकडून त्या देशांचे सर्वोच्च सन्मान मिळाले आहेत.

आतापर्यंत जगात कोणत्याही देशाच्या पंतप्रधानांना इतके सन्मान मिळालेले नाहीत.

**कुमार आठवले**

# केल्याने देशाटन...

**केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार,**
**शास्त्र चर्चा विचार, होय विस्तार ज्ञानासी**

या एका ओवीत समर्थांनी संपूर्ण जीवनविकासाचा मार्ग सांगितला आहे. ज्ञान, अनुभव आणि समाजजाण–ही तीन गोष्टी जीवनात असतील तर मनुष्याचा संपूर्ण विकास होतो.

देशाटन म्हणजे फक्त फिरणे, पर्यटन नाही. देशाटन म्हणजे जग पाहणे. जेव्हा आपल्या गावापुरते मर्यादित मन, बाहेर पडते, तेव्हा आपल्याला नव्या संस्कृती दिसतात, नवे विचार कळतात. प्रवासातून मनाचे क्षितिज विस्तारते. जग पाहिल्याने आपला दृष्टिकोन मोठा होतो आणि मोठा झालेला दृष्टिकोनच मनुष्याला महान बनवतो.

देशाटन करताना अडचणी येतात तिथलं वेगळं हवामान, अन्न, भाषा, संस्कृती पण त्या अडचणीच मनाला आणि शरीराला घडवतात. कठीण प्रसंगात स्थिर राहण्याची क्षमता वाढवतात. समाज म्हणजे कुंपणरहित शाळा आणि प्रवास म्हणजे खुली प्रयोगशाळा. जगातील विविध लोक कसे जगतात हे पाहिलं की स्वतःच्या समस्या लहान वाटू लागतात. विनम्रता येते, सहिष्णुता येते आणि हेच आध्यात्मिक प्रगतीचे बीज आहे.

पंडित म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञानी नाहीत, तर विचारवंत, अनुभवी लोक. विद्वानांचा सहवास हा आपल्या बुद्धीला चालना देतो. त्यांच्या बोलण्यातून कठीण प्रश्नांची उत्तरं कदाचित सहज मिळून जातात. नकारात्मकता जाऊन मनाला उभारी येते. ज्ञानी लोकांशी मैत्री केली की मनाचे दोष कमी होतात. पूर्वग्रह नाहीसे होतात. मन प्रगल्भ होतं. ज्ञान आपल्यात उतरू लागायचं तर त्यासाठी सज्ञनांचा, संतांचा, विद्वानांचा सहवास आवश्यक असतो. जसा एक दिवा दुसऱ्या दिव्याला लावला की दोन्ही दिवे तेजोमय होतात–तसंच पंडित मैत्रीचं आहे. पण इथे नुसता व्यक्ती सहवास नाही तर विचार आणि चर्चेत सहभाग पण अपेक्षित आहे.

सभांमध्ये जाणे म्हणजे लोकांना भेटणं. विविध विचार, वेगवेगळ्या भावना, अनुभव ऐकणं. समर्थ म्हणतात की समाजात मिसळा, लोकांशी बोला, त्यांचे विचार ऐका– कारण प्रत्येक माणूस हा एक ग्रंथ असतो. सभा म्हणजे अनुभवांचा खजिना. लोकांच्या गरजा, त्यांचे संघर्ष, त्यांचे आनंद–दुःख समजते. सभेत बोलताना आपला आत्मविश्वास वाढतो.

लोकांच्या बोलण्याने आपली दृष्टी विस्तृत होते, विषयाची दुसरी बाजू देखील समजते. एकांतात बसल्याने कदाचित आत्मज्ञान येते पण लोकांमध्ये राहिल्याने समाज जाण नक्की येते.

देशाटन अनुभव देतं, पंडित मैत्री विचार देतं, सभेत संचार व्यवहार देते आणि या तिन्ही मुळे एक सकारात्मक मनुष्य घडतो.

जग वेगाने बदलतंय–म्हणून अनुभव हवेत, विचार हवेत आणि समाज जाण हवी. केवळ पुस्तकातून ज्ञान मिळत नाही; केवळ लोकांमध्ये मिसळून अनुभव मिळत नाही; केवळ प्रवास करून शहाणपण मिळत नाही. तीनही गोष्टींचा संगम झाला की मनुष्य खरा अनुभव–ज्ञानी होतो. त्याचे निर्णय अचूक होतात.

ज्ञान वाढवायचं असेल तर बाहेर पडा, सज्ञनांचा सहवास करा आणि लोकांशी संवाद साधा.

समर्थांच्या या उपदेशातून प्रेरणा घेऊन या सुट्टीत किंवा नवीन वर्षात तुम्ही कोणत्या नवीन ठिकाणी भेट देणार आहात, कोणत्या क्लब / विचारमंच / संस्थे मधे सहभाग घेणार आहात, कोणते नवे गुरु शोधून एखादी नवी कला शिकणार आहात ते जरूर सांगा.

**जय जय रघुवीर समर्थ!**

**प्रमोद रामदासी (अमेरिका)**

◈ ◈ ◈

# महाशिवरात्री - शिकवण आत्मसंयमाची!

महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील एक अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा सण आहे. हा सण फाल्गुन महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्दशी तिथीला साजरा केला जातो. महाशिवरात्री म्हणजे शिवाची महान रात्र – भगवान शंकरांची आराधना करण्याचा विशेष दिवस.

पुराणकथांनुसार या दिवशी भगवान शंकर आणि माता पार्वती यांचा विवाह झाला, अशी श्रद्धा आहे. काही ग्रंथांनुसार असे सांगण्यात येते की, याच दिवशी भगवान शंकरांनी तांडव नृत्य केले आणि समुद्रमंथनातून निघालेलं विष पिऊन समस्त सृष्टीचे रक्षण केले. त्यामुळे महाशिवरात्रीला त्याग, संयम आणि कल्याणाचे प्रतीक मानले जाते.

- **महाशिवरात्रीच्या काही प्रसिद्ध कथा /कहाणी :**

**१) समुद्रमंथनाची कथा:**

देव आणि असुर यांनी एकत्र येऊन समुद्रमंथन करण्याचे ठरवले. या मंथनातून अमृत निघावे, ही सर्वांची इच्छा होती. पण अमृताआधी समुद्रमंथनातून एक भयानक विष (हालाहल) बाहेर आले. ते इतके तीव्र होते की संपूर्ण सृष्टी नष्ट होण्याची भीती निर्माण झाली.

सर्व देव घाबरले आणि भगवान शंकरांकडे मदतीसाठी गेले. सृष्टीचे रक्षण करण्यासाठी महादेवांनी कोणताही विचार न करता ते विष स्वतः प्राशन केले. विष शरीरात जाऊ नये म्हणून त्यांनी ते गळ्यातच धरून ठेवले. त्यामुळे त्यांच्या कंठाचा रंग निळा झाला आणि ते नीलकंठ म्हणून ओळखले जाऊ लागले.

देव-ऋषींनी विषाचा प्रभाव कमी व्हावा म्हणून भगवान शंकरांवर पाणी, दूध, बेलपत्र अर्पण केले. असे मानले जाते की ही घटना माघ कृष्ण चतुर्दशीच्या रात्री घडली आणि तीच रात्र पुढे महाशिवरात्री म्हणून ओळखली जाऊ लागली.

**२) शिव-पार्वती विवाहाची कथा:**

आणखी एका कथेनुसार, महाशिवरात्रीच्या दिवशीच भगवान शंकर आणि माता पार्वती यांचा विवाह झाला. देवी पार्वतीने अनेक वर्षे भगवान महादेवांची कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन महादेवांनी तिला पत्नी म्हणून स्वीकारले. त्यामुळे हा दिवस दांपत्य सौख्य, भक्ती आणि समर्पणाचे प्रतीक मानला जातो.

**३) व्याध आणि हरीण:**

एका शिकाऱ्याने शिकारिच्या शोधात आणि जंगली प्राण्यांना घाबरून संपूर्ण रात्र एका झाडावर काढली. त्याने ज्या झाडाचा आसरा घेतला ते झाड बेलाचे होते, नकळत त्याने स्वतः च्या बचवाकरिता शिवाचा जप करत एक एक बेलपत्र खाली टाकले आणि रात्रभर जागून त्याने केलेले बेलपत्र व जप शिवाला अर्पण झाले. सकाळी त्याला एक हरीण दिसले तो त्याची शिकार करणार होता तेव्हा हरिण म्हणाले की माझ्या लहान पिल्लाला भेटून मी परत येईन, शिकाऱ्याला सांगितल्याप्रमाणे हरिण परत आले परंतु शिकाऱ्याने त्या हरिणाला जीवदान दिले. त्याला घडलेल्या उपवासाने आणि भक्तीने प्रसन्न होऊन शिवाने त्याला दर्शन दिले आणि मोक्ष प्रदान केला. या कथेतून आपल्याला संयम आणि आत्म जागृतीचे महत्त्व दिसते.

- **महाशिवरात्रीचे महत्त्व :**

या कहाण्यांमुळे महाशिवरात्रीला त्याग, संयम आणि भक्तीचा दिवस मानले जाते. या दिवशी उपवास, रात्रभर जागरण, शिवपूजन आणि 'ॐ नमः शिवाय' मंत्रजप केला जातो. महाशिवरात्री आपल्याला शिकवते की स्वतःच्या त्यागातूनच जगाचे कल्याण होते.

महाशिवरात्रीच्या दिवशी भक्त उपवास करतात आणि रात्रभर जागरण करून शिवभक्ती करतात. शिवलिंगावर दूध, पाणी, मध, दही, बेलपत्र, धतूरा आणि भस्म अर्पण केले जाते. ॐ नमः शिवाय या मंत्राचा जप केला जातो. चार प्रहरांची पूजा हीच या सणाची खास ओळख आहे.

- **आध्यात्मिक संदेश**

महाशिवरात्री आपल्याला आत्मसंयम, साधना आणि अंतर्मुखतेचा संदेश देते. अंधारातून प्रकाशाकडे जाण्याची, अज्ञानातून ज्ञानाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा हा सण देतो. आपल्याला माहितच आहे की, भगवान शंकर हे वैराग्य, समता आणि करुणेचे प्रतीक मानले जातात.

- **सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व**

भारतभर तसेच जगातील अनेक भागांत महाशिवरात्री मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. मंदिरांमध्ये भजन, कीर्तन, अभिषेक

आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. हा सण लोकांना एकत्र आणून श्रद्धा, शांतता आणि सकारात्मकतेची भावना निर्माण करतो.

महाशिवरात्री हा केवळ धार्मिक सण नसून आत्मशुद्धी, संयम आणि जीवनमूल्यांची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रद्धा, भक्ती आणि सद्भावनेने हा सण साजरा केल्यास जीवनात शांती आणि समाधान प्राप्त होऊ शकते.

वैज्ञानिकदृष्ट्या ह्या दिवसाचे महत्त्व जाणून घेतले तर या दिवशी व रात्री ग्रहांच्या संरेखनाशी जे जुळते ते मानवी प्रणालीतील नैसर्गिक ऊर्जा वाढवते, म्हणून या दिवशी किंवा रात्री समयी केलेल्या जागरण व जप ज्यामुळे आध्यात्मिक साधना आणि आंतरिक विकासासाठी हा एक शुभ काळ बनतो. या रात्री, वैश्विक ऊर्जा त्यांच्या शिखरावर असतात, ज्यामुळे खोल ध्यान, आत्मचिंतन आणि आध्यात्मिक जागृती सुलभ होते अशी धारणा आहे.

म्हणूनच महाशिवरात्री हा केवळ एक उत्सव किंवा सण नाही. तर तो एक शिव आराधनेतून घडणारा आध्यात्मिक प्रवास आहे. अनेक दंतकथा आणि कथा सूचित करतात की .महाशिवरात्रीला केल्या जाणाऱ्या विधींमुळे भक्तांना आंतरिक परिवर्तन , संयम आणि आत्म-शिस्त, लवचिकता, भक्ती, ज्ञान, आध्यात्मिक जागरूकता आणि जीवनात संतुलनाचा विकास अनुभवण्यास मदत होते.

**!!हर हर महादेव!!**

**ॲड. स्वाती जेरे**

◈ ◈ ◈

## कविता

## Technological

Out dated झालंय आयुष्य, स्वप्नही download होत नाही,
संवेदनांना virus लागलाय, दु:खं send करता येत नाही.
जुने पावसाळे उडून गेलेत, Delete झालेल्या file सारखे,
अन घर आता शांत असतं, Range नसलेल्या mobile सारखे.
Hang झालेल्या PC सारखी, नात्यांची स्थिती वाईट,
जाती नाती जोडणारी, कुठेच नाही website.
एकविसाव्या शतकातली, पीढी भलतीच cute,
contact list वाढत गेली, पण संवाद झाले mute.
Computer च्या chip सारखा, माणूस मनानं खुजा झालाय,
अन mother नावाचा board, त्याच्या आयुष्यातून वजा झालाय.
Hard Disk Drive मध्ये, आता संस्कारांनाच जागा नाही,
अन फाटली मनं सांधणारा, internet वर धागा नाही.
हि विज्ञानाच्या गुलामगिरीत, केवढी मोठी चूक,
रक्ताच्या नात्यांनाही.
आता लागते Whats-pp आणि Facebook.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# आधुनिक विज्ञान - नवनिर्माण की पुनर्शोध
# लेखांक २

सुमारे ३५०० वर्षांपूर्वी 'शल्वसूत्रे' लिहिली गेली ज्यात मोजमापाची तत्त्वं मांडली गेली. त्या सूत्रांमधे सध्याचा ज्ञात पायथागोरसचा सिद्धांत अंतर्भूत आहे. वर्तुळाचे क्षेत्रफळ व 'पाय'ची किंमत ३.१४१५९ हेही नमूद केले आहे. कृष्ण यजुर्वेदातल्या 'बौधायन' आणि 'आपस्तंभ सूत्र' यांच्यामधे 'डायोफंटाईन' समीकरणांचा उल्लेख आहे पण पाश्चिमात्य त्याचे श्रेय ग्रीकांना देतात. विज्ञानवाद्यांना ही सूत्रे माहीतही नसतील, वाचणे सोडून द्या. अख्खं गणित उभे आहे ते 'शून्य' संकल्पनेच्या आधारावर, जी महान देणगी भारताने जगाला दिली.

पृथ्वीभोवती सारे ग्रह फिरतात ही समजूत जगभर अगदी सतराव्या शतकापर्यंत लोकांच्या मनात ठाम रूजली होती. अगदी अलीकडचा संदर्भ घेऊ. पूज्य ग्रंथ ज्ञानेश्वरी ग्रंथामधील चौथ्या अध्यायात ९९ वी ओवी काय सांगते ते वाचा. आणि

**उदो अस्ताचेची प्रमाणे । जैसें न चालतां सूर्याचें चालणे।**

**तैसे नैष्कर्म्यत्व जाणे । कर्मीचि असतां।।**

ही ओवी स्पष्ट सांगते की 'सूर्य जरी उदयास्त होण्याकरता चालताना दिसतो, पण तो न चालता स्थिरच असतो'. तथापि सध्या या सिद्धांताचे श्रेय कोपर्निकसला दिले गेले आहे. हे ज्ञान ज्ञानेश्वरांच्या काळी इतके सामान्यज्ञान होते की त्याचा उपयोग श्रीज्ञानेश्वर माऊलींनी नैष्कर्म्यत्व स्पष्ट करताना उपमा म्हणून केला आहे. उपमा नेहमीच कठीण विषय सोपा करून सांगण्यासाठी देतात. ज्या गोष्टीची, कृतीची, घटनेची उपमा देतात ती सर्वसामान्यांना नेहमीच्या दैनंदिन व्यवहारात माहिती असलेली व परिचित असलेली व पटलेली असावी लागते. सारांश कोपर्निकसच्याही ४०० वर्षे अगोदर मसूर्य स्थिर आहेफ हे सामान्यज्ञान आपल्याला अवगत होते. मग हा पाश्चात्यांचा शोध नवा कसा म्हणता येईल? वस्तुतः हा सिद्धांत आपल्या वेदांना व ऋषीमुनींना अवगत होताच.

अणूचे अभ्यासाच्या बाबतीत कणाद किंवा कश्यप यांनी वैशेषिक दर्शनशास्त्रात पदार्थ अणूचा बनलेला आहे. एक अणू व त्याचे परमाणू एकत्र पाहिले तर ती या सूर्यमालेची प्रतिकृती आहे. तसेच अणू चिरंतन स्वरूपाचे आहेत. नित्यत्व हे त्यांचे खास वैशिष्ट्य आहे. या अणूंच्या ठिकाणी अविरत स्पंदनशील गतिमानता आहे हे त्यांनी सांगितले आहे. महर्षी कणाद या भारतीय तत्त्वज्ञानं अणू संकल्पना मांडून 'प्रत्येक गोष्ट अणु-रेणूंनी बनलेली असते' असे प्रतिपादन केले होते. या संदर्भात 'श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृतातील' दुसऱ्या अध्यायातील राजपंडितांनी शंकरभट्टाची घेतलेल्या ज्ञानपरीक्षेचा प्रसंग वाचा. कणाद ऋषींनी सांगितलेल्या सृष्टीच्या अणूरहस्याचा गणिती संदर्भ तिथे आला आहे. थोडक्यात अणुज्ञानाचा उगम कुठे तर भारतात आहे हे लक्षात घ्या.

सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी वराहमिहिर हा एक महान गणितज्ञ होऊन गेला. त्याचे अचूक ज्योतिषज्ञानावर मी पूर्वी एक लेखही लिहिला होता. विश्वातल्या ग्रहांमध्ये काहीतरी आकर्षणशक्ती आहे आणि त्यांच्या या सगळ्या शक्तींच्या गोळाबेरजेमुळेच पृथ्वी अधांतरी राहते हे त्याचे म्हणणे म्हणजे गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत नव्हे काय? ग्रहगोलांचा जन्मकालीन ग्रहस्थितीनुसार मानवाच्या जीवनावर परिणाम होतो ह्यासंबंधीचे गाढे खगोलीय ज्ञान त्याला होते म्हणूनच त्याचे भविष्यकथन अचूक असे.

पाचव्या शतकातील आर्यभटाने भूमितीत लागणाऱ्या 'साईन' फंक्शन्सचा विचार आणि वापरही केला होता. पृथ्वीचा गोलपणा आणि स्वतःच्या अक्षाभोवती (ॲक्सिस) तिचं फिरणं याचीही त्याला कल्पना होती. त्याला अंतराळातल्या ग्रहताऱ्यांचं स्थानही नक्की ठाऊक होतं. त्याने लिहिलेल्या मआर्यभटियाफमधे तो म्हणतो, 'जरी आपल्याला आकाशातले सूर्य, तारे पृथ्वीभोवती फिरल्यासारखे वाटले तरीही खरंतर तेच स्थिर आहेत आणि पृथ्वीच त्यांच्याभोवती फिरते'. 'ज्ञानेश्वरीतील संदर्भाव्यतिरिक्त हे उदाहरण दीड हजार वर्षांपूर्वीचे आहे. पृथ्वीचा परीघ त्यानं ३९७३६ कि.मी. असा गणितानं काढला होता. आज तो परीघ ३९८४३ कि.मी. असल्याचे आधुनिक विज्ञानात नमूद आहे.

केवढे हे अचूक उत्तर !! त्याचे अजून काही सिद्धांत असे होते – 'चंद्राला स्वतःचा प्रकाश नसून तो सूर्यापासून मिळालेला असतो', 'ग्रह लंबवर्तुळाकार भ्रमण करतात'. लंबवर्तुळाकार भ्रमणाच्या तपशीलातून ज्योतिषातील 'राहू' या काल्पनिक बिंदूचे स्पष्टीकरण मिळते. आर्यभटानं एका वर्षात ३६५ दिवस, ६ तास, १२ मिनिटं आणि ३० सेकंद असतात हेही शोधून काढलं होतं ! त्याचे लिखाण अनेक शतकांनंतर १८६४ साली भाऊ दाजी लाड यांना प्रथम मिळालं. त्यानंतर १८७५ साली डॉ. केन यांनी हे लिखाण हॉलंडमध्ये प्रकाशित केलं, तेव्हा ते सगळ्या जगाला कळलं !

(क्रमशः)

**हणमंत नाडगौडा**

◈ ◈ ◈

**समाजामध्ये आपली उंची ही फुटावर नाही,**
**तर विचारांवर मोजली जाते,**
**आणि वजन हे किलोवर नाही,**
**तर शब्दांवर अवलंबून असते,**
**तसेच आपली किंमत ही कमावलेल्या पैशावर नाही**
**तर, कमावलेल्या माणसांवर अवलंबून असते...**

**विचारधन...**

आपल्या समोर असलेल्या व्यक्तीसोबत संवाद न साधता व्हर्चुअल दुनियेतच सगळे रमू लागलेत. मग कधी नैराश्य आल्याने किवा भावनांची मनात कोंडी झाल्याने कठोर पाऊल उचलले जाते आणि त्यावेळीही सोशल मीडियाचा आधार घेतला जातो, असे तज्ज्ञाचे म्हणणे आहे. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे माणसाच्या भावना बोथट झाल्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर मर्यादित ठेवा, असा सल्लाही दिला जातोय. सोशल मीडिया हे सध्या सगळ्यांच्या हातातले खेळणे झालेय. नैराश्याने ग्रासलेल्या माणसाला त्याच्या भावना कोणासमोर तरी मांडायच्या असतात. मग सोशल मीडियाचा उपाय निवडला जातो. पण, या माध्यमात तितकेसे गांभीर्य राहिलेले नाही. तुमच्या ओळखीची एखादी व्यक्ती तुम्हाला काही सांगू इच्छित असेल, तर त्याला जरूर मदतीचा हात द्या. मनाची झालेली कोडी, व्यथा कोणासमोर तरी मांडायची असते. पण तो आधार, मदतीचा हात कोणीच द्यायला नसते. म्हणून सोशल मीडियावर अशाप्रकारे भावना व्यक्त केल्या जातात.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**
**जनता वेल्फेअर सोसायटी**
**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**
**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

## मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : भाग २

# हिंदू म्हणविणारा मार खाऊ लागला

भारतावर इंग्रजांचे राज्य आले. हे राज्य आपल्या लोकांच्या एकीच्या अभावातून आले होते व अनेक वर्षे इंग्रजांचे राज्य टिकले देखील आपल्यातील एकीच्या अभावामुळेच. आपल्या देशातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन इंग्रजांनी अनेक धूर्त चाली केल्या व या धूर्त चालींना आम्ही बळी पडत गेलो. आमच्या जाती–जातींमध्ये भांडणे लावली गेली, हिंदू व मुसलमान हे वेगळे आहेत हे सातत्याने पटवून देण्याचा प्रयत्न केला गेला. हिंदू व मुसलमान यांच्यात एकी होऊ नये यासाठी वेगवेगळ्या मार्गाने इंग्रजांनी कुटील डाव रचले, याचा परिणाम म्हणून भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाला सुरुवातीच्या काळामध्ये गती मिळू शकली नाही.

हिंदू म्हणविणारे जाती – उपजातींमध्ये विभागले गेले व आपल्या – आपल्यामध्येच क्षुल्लक कारणावरून भांडू लागले. आपल्यातच भांडणं लागल्यामुळे आपण एक होऊन इंग्रजांशी लढू शकलो नाही. त्यातच हिंदू धर्म जाती – उपजातीमध्ये विभागला गेल्यामुळे हिंदू धर्माबद्दल कोणालाच आत्मीयता राहिली नाही. याचा परिणाम इंग्रज देखील हिंदूंना जमेस धरत नव्हते. उलट मुस्लिम समुदायाला त्यांनी जवळ करण्याचा प्रयत्न केला, त्यातच भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत नेतृत्व करणारे हिंदू असणारे नेतेदेखील हिंदू या शब्दाची ॲलर्जी असल्याप्रमाणे वागू लागले. त्यामुळे आम्ही हिंदू आहोत असे म्हणविणारे प्रत्येक ठिकाणी मार खाऊ लागले.

एक वेळ गाढव म्हणा पण हिंदू म्हणू नका अशी भावना बळावत चालली. अशी भावना बळावणे हे येथील धर्म – संस्कृतीच्या व देशाच्या भविष्याच्या दृष्टीने धोक्याचे होते. ही धोक्याची घंटा काही जणांना ऐकू आली व त्यांनी हिंदू धर्मातील समुदायाला एकत्र करण्याचा व हिंदू समाजाला संघटित करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांना काहीअंशी यश लाभले, परंतु इतिहासाच्या आढावा घेतल्यास अठराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळापर्यंत या भूमीमध्ये आम्ही हिंदू आहोत म्हणविणाऱ्यांनी दुर्दैवाने मारच खाल्ला आहे.

- **...म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली**

हिंदू धर्मातील अंतर्गत दुफळीमुळे इंग्रजांनी कायमच मुस्लिम समुदायाची बाजू उचलून धरली. विशेषतः गौरी गणपती व नवरात्रीच्या दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणावर मुस्लिमांकडून हिंदूंची घरे लुटली जाऊ लागली, यामध्ये हिंदूंना संरक्षण देण्याऐवजी इंग्रजांनी मुस्लिमांना मदत करण्याचे काम केले, त्यातच भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचे नेतृत्व करणाऱ्या हिंदू पुढार्यांनी देखील हिंदूंची बाजू घेण्याऐवजी मुस्लिमांना गोंजारनेचे काम केले.

देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचं नेतृत्व करण्यासाठी सन १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना होऊन देखील पुढच्या काळात सन १९०६ मध्ये मुस्लिम लीगची स्थापना करण्यात आली. इंग्रजांनी हिंदू व मुस्लिम बहुल असणाऱ्या दोन प्रांतांची निर्मिती करून बंगालची फाळणी सन १९०५ मध्ये केली, यापासून प्रेरणा घेऊन मुस्लिम लीगची स्थापना करण्यात आली होती. महात्मा गांधीजींनी राष्ट्रीय सभेचे अर्थात काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर खिलाफत चळवळीला पाठिंबा देणे, प्रत्येक वेळेस मुस्लिमांचे लांगुलचालन करणे, मुस्लिमांचा वंदे मातरमला असणारा विरोध स्वीकारणे, हिंदू – मुस्लिम दंग्यांमध्ये मुस्लिमांची बाजू घेणे यासारखे प्रकार वारंवार घडायला लागल्यानंतर या भारत भूमीला मातृभूमी, पितृभूमी मानून या भूमीमध्ये आजपर्यंत जे महापुरुष होऊन गेले, त्यांना आपला आदर्श मानणाऱ्या हिंदू समाजाचे संघटन झाल्याशिवाय या देशाला स्वातंत्र्य मिळून देखील ते टिकणार नाही व त्याचा काही उपयोग होणार नाही हे लक्षात घेऊन काँग्रेसच्या चळवळीमध्ये सक्रिय असणाऱ्या डॉ.श्री.केशव बळीराम हेडगेवार यांनी सन १९२५ सालच्या विजयादशमी दिवशी हिंदू समाजाचे संघटन करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली.

**– डॉ. सचिन वसंतराव लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख, रा.स्व.संघ**

◈ ◈ ◈

# माणसं खोटं का बोलतात?
## (एक मानसशास्त्रीय दृष्टिकोन)

सध्या Podcast वाल्यांची खूप चलती आहे. समाज माध्यमांवर (Social Media), जसं की, Facebook, YouTube इत्यादी वर नुसता यांचा सुळसुळाट झाला आहे. पण अनेकांमध्ये एक वेगळेपण जपणारे You Tube Podcaster आहेत, ते म्हणजे 'अमुक तमूक' नावाने एक Podcast चालवणारे 'शार्दुल कदम आणि ओंकार जाधव.' विविध विषयांवरील, मान्यवर तज्ज्ञांना त्यांच्या channel वर बोलवून त्या विषयासंदर्भात मुलाखतीच्या माध्यमातून, ते प्रेक्षकांना महिती उपलब्ध करून देत असतात. अशा वक्त्यांमधे, नियमित हजेरी लावणारे, म्हणजे प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉक्टर नंदू मुलमुले, डॉक्टर शिरीषा साठे, हे असतात. यांचे विषय सुद्धा खूप भारी असतात.

असंच मागच्या आठवड्यात, डॉक्टर नंदू मुलमुले, यांची 'माणसं खोटं का बोलतात?' अशा एका interesting विषयावरची मुलाखत आवर्जून पाहिली. हा विषय interesting वाटण्याचं कारण, म्हणजे, आपण प्रत्येक जण आयुष्यात एकदा तरी किंवा अनेकदा खोटं बोलत असतो. त्यामागची नेमकी मानसशास्त्रीय कारणं काय असू शकतात? आयुष्यात वयाच्या नेमक्या कोणत्या टप्प्यावर खोटं बोलायला सुरुवात होते? खोटं बोलतांना मेंदूवर नेमका येणारा ताण. तसंच खोटं बोलतांना माणसाची, शारीरिक हालचाल, डोळ्यांची हालचाल, यांची तपशीलवार माहिती या मुलाखतीद्वारे प्रेक्षकांना मिळते.

या मुलाखतीत जी काही माहिती मला आठवत आहे, त्यातील काही interesting मुद्दे याप्रमाणे:

१) माणूस साधारणपणे वयाच्या दुसऱ्या वर्षापासून खोटं बोलायला सुरुवात करतो, तो आयुष्यभर. सुरूवातीला नुसतंच, नंतर वय वाढेल तसं, खोटं बोललेले खरं भासवण्यासाठी, त्याला अभिनयाची जोड देतो. हे कसब वयाच्या साधारण आठव्या वर्षापर्यंत प्रगत होते.

२) खोटं बोलण्यासाठी खूप चातुर्य लागतं.

३) खोटं बोलून ते सिद्ध करण्यासाठी मेंदूला खूप काम करावंच लागतं. त्यासाठी काय खोटं बोललो, हे लक्षात ठेवण्यासाठी खूपच प्रयास करावे लागतात. त्यामानाने खरं बोलण्यासाठी मेंदूला फारसं काही काम उरत नाही.

४) सर्वसाधारणपणे Self Defence साठी सर्वात जास्त वेळा खोटं बोलावं लागतं.

५) काही लोक केवळ खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी खोटं बोलतांना दिसतात.

६) काही लोक सवय म्हणून खोटं बोलतात.

७) केवळ दुसऱ्याचं नुकसान होऊ नये म्हणून किंवा दुसऱ्याचा जीव वाचावा म्हणून बोललेलं खोटं हे क्षम्य ठरतं.

८) राजकारणी आणि नेते बहुसंख्य वेळा खोटंच बोलत असतात. जनतेला खोट्या आशा दाखवून, स्वतःची उन्नती करून घेत असतात.

९) तसं पाहिलं तर हे जगच मुळात आभासी किंवा मायावी तत्वावर उभं असेल, तर नेमकं खरं का बोलावं, हा ही प्रश्नच आहे.

१०) झोपेत पडलेली स्वप्न ही, खोटीच दृश्य असतात. पण काही वेळा ती माणसाला त्याची ध्येय साध्य करण्यासाठी प्रेरित करतात.

११) माणसाचं संपूर्ण आयुष्यच 'उद्याचा दिवस यापेक्षा चांगला असेल' यांच एका खोट्या आशेवर अवलंबून असतं त्यामुळे बाकीचं सगळं खोटं यासमोर फिकं पडतं.

१२) सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, माणूस, सगळ्यांशी खोटं बोलू शकतो, पण स्वतःशी मात्र खोटं बोलू शकत नाही. त्यामुळे सद्सद्विवेकबुद्धी जागृत असल्यास प्रचंड अपराधीपणाची भावना कायम छळत रहाते.

१३) खोटं बोलणारा माणूस सवयीने ओळखता येऊ शकतो. तो बोलतांना नजरेला नजर देऊन बोलू शकत नाही. ही आणि, अशीच बरीच गंमतीशीर आणि मनोरंजक माहिती मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून, या podcast मिळते.

अर्थातच मी या podcast करणाऱ्या channel चा Brand Ambassador वैगेरे नाही. फक्त, मला ही मुलाखत वेगळी वाटली, म्हणून आपल्या समोर मांडली इतकंच.

**ब्रह्मानंद घुगरे**

◈ ◈ ◈

# आत्मनिर्भरतेमुळे भारत अधिक बलवान

## निर्देशित पिनाक अग्निबाणच्या यशस्वी चाचण्यांमुळे भारताची ताकद वाढली.

मागील वर्ष २०२५ च्या शेवटच्या काही दिवसात भारताने अनेक क्षेपणास्त्रे, स्वदेशी तंत्रज्ञान अद्ययावत व अत्याधुनिक करून, वाढीव क्षमतांच्या प्रदर्शनासह यशस्वी चाचण्या घेतल्या. आपल्या शेजारील शत्रू देशाच्याच १२० किमी सुदूर असणारे शत्रुलक्ष्य आपली सीमा न ओलांडता अचूकतेने व नेमके पणाने मारा करून ते नष्ट करण्याची क्षमता मिळवली. बहुनलीकीय अग्निबाण प्रणाली पिनाक याची सुधारित आवृत्ती म्हणजेच निर्देशित पिनाक (LRGR-120) याच्या यशस्वी फायरींग चाचण्या ओडिशाच्या बालेश्वर जवळ समुद्र किनारी असणाऱ्या चांदिपूर येथे करण्यात आल्या. याचा परिणाम अतिशय उत्साह वर्धक म्हणजे, सर्व चाचण्या जसे ठरविले तशा, इंग्रजीत Textbook Precision म्हणतात तसे मिळाले. त्या सर्वांची मोजदाद करणे आणि प्रक्षेपका पासून सुरू झालेला व शत्रुलक्ष्य भेद होई पर्यंतचा हवाई मार्ग नोंदणे व रेखांकित करणेसाठी असणारी सर्व संयंत्र (Range InstInstrumen) रचना पूर्णवेळ कार्यरत होती. ही निर्देशित पिनाक Long Range Guided Rocket - (LRGR-120) प्रणाली एआरडीई या डीआरडीओच्या पुणे येथील महत्वाच्या संस्थे मध्ये विकसित करण्यात आले. पिनाक प्रणाली साठी माझेही छोटेसे योगदान असल्याने, या वृत्ताने अभिमानाने छाती फुलली आहे, आणि गगनात आनंद मावेनासा झाला आहे. अगदी SS-45 हे जमिनीवरून डागणे व जमिनीवरील (४५ कि.मी.) लक्ष्यभेद करणारी प्रणाली विकसित करताना १९८० च्या दशकापासून सुरवात करून पिनाक-मार्क १ ३९ किमी पल्ल्यावरील लक्ष्य भेदणारी अग्निबाण प्रणाली सेवेत दाखल करून भारतीय सशस्त्र सेनेचा तोफखाना विभाग मजबूत केला.

पिनाक प्रणाली संशोधन व विकास कार्यात मुख्य एआरडीई बरोबरच एचईएमआरएल, व्हीआर डी ई यांचा ही सहभाग आहे. टाटा एल अॅन्ड टी, बीईएमएल, प्रक्षेपक उत्पादन तर आयुध निर्माणी, इकॉनॉमिक एक्स्प्लोझिव्ह हे अग्निबाण निर्माण व पुरवठा करतात. सर्व वाहने बीईएमएल पुरवते, अशा सर्वांच्या प्रयत्नातून -भारतीय सेनेस मोठ्या प्रमाणावर पिनाक उत्पादन करून पुरवठा केला जातो. सध्या तेरा लष्करी तोफ खान्यांकडे, (Regiments) पिनाक प्रणाली कार्यरत असून पंचवीस लष्करी तोफखान्यांची तयारी सुरु आहे. अशा शस्त्रसिध्द पिनाक तोफखाना उत्तरी व पश्चिम सीमांवर तैनात आहेत. त्या सर्वांची क्षमता निर्देशित पिनाक च्या यशस्वितेमुळे वाढणार आहे. या साठी लागणारी निर्देशन व नियंत्रण प्रणाली हैदराबादस्थित आरसीआय या क्षेपणास्त्र विकास तज्ज्ञ संरक्षण संशोधन संस्थेचा मोलाचा सहभाग आहे. त्यामुळेच १२० किमी पल्ल्यावरील शत्रुलक्ष्य भेद अचूक व नेमकेपणाने करण्याचे शक्य झाले. नाहीतर पल्ला वाढला की अचूकता कमी होते, म्हणून निर्देशित पिनाक ची आवश्यक्ता अधोरेखित होते.

या प्रणाली चे अजुनि एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, हे अग्निबाण आपल्याकडे असणाऱ्याच प्रक्षेपक वाहनां वरून (Pinak MBRL vehicle) हे सहजतेने कोणाताही बदल न करता डागता येतात. त्यामुळे युद्धभूमी वर कमिवेळात केवळ अग्निबाण बदल करून वेगवेगळ्या पल्ल्याचे अग्निबाण सध्या असणाऱ्या यंत्रणेचाच उपयोग करुन नेमकेपणाने व अचुकतेने शत्रू लक्ष्य डागता, लक्ष्य भेदता येते. या सर्व चाचण्यांच्या नोंदी व मोजमाप करणारी संयंत्र रचना ओडीशाच्या बालेश्वर जवळील चांदीपुर समुद्र किनारपट्टीवर डीआरडीओ ने विकसित केलेल्या दोन संस्था आयटीआर व पीएक्सई यांचे फार मोठे व मोलाचे योगदान असते.



या निर्देशित पिनाक च्या यशस्वी चाचण्यां नंतर भारताच्या रक्षामंत्र्यांनी डीआरडीओ च्या शास्त्रज्ञां चे अभिनंदन व कौतुक करताना म्हणले की या प्रणाली मध्ये युध्दाचे परिणाम आपल्या बाजूने फिरवण्याची ताकद (Game changer Technology) आहे. ज्यामुळे महत्वाची शत्रुलक्ष्ये (High Value Targets) निर्देशित पिनाकच्या टापूत येतात व मारा करणे सहजसाध्य झाले आहे.

पिनाक अग्निबाण प्रणालीची महत्वाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे,

१. एका प्रक्षेपकावर बारा अग्निबाण, अशा सहा प्रक्षेपक वाहनांची एक तुकडी म्हणजे बॅटरी, साल्व्हो (Salvo) फायरींग मध्ये केवळ ४४ सेकंदात ७२ अग्निबाण डागण्याची क्षमता व अचुकतेने मारा करून एक वर्ग किलोमीटर क्षेत्रफळा वरील लष्करी ठाणे वा शत्रुलक्ष्य बेचिराख करून नष्ट करण्याची क्षमता.

२. एका अग्निबाणाचा बॉम्ब म्हणजेच युध्दशीर्ष शंभर किग्रॅ स्फोटके वाहून नेण्याची क्षमता व विविध परीणाम देणारे युद्धशीर्ष उदा. स्फोट करून बॉम्ब फोडल्यावर हजारो तुकडे (fragments) होऊन असंख्य गोळ्यांप्रमाणे लक्ष्यभेद करणारे. दुसरा प्रकार म्हणजे आगी लावणारे, तिसरा भयानक स्फोट घडवून तेथील बांधकाम, इमारती पाडणारे इत्यादी

३. अतिशय नेमकेपणाने अचूक मारा क्षमता ही निर्देशन प्रणाली ची एकात्मिक चालन, नियंत्रण आणि IRNSS (Indian Reginal Navigation Satellite System) यांच्या एकत्रित प्रयोग केल्याने आहे.

४. मारक पल्ला (strike range) १२० कि.मी. अचुकता व नेमकेपणाने (High precision) लक्ष्यभेद

५. उपलब्ध अग्निबाण प्रकार (Variants) 'पिनाक -१' - अनिर्देशित, सुमारे ४० किमी पल्ला, पिनाक-२ - ७० ते ९० किमी पल्ला , निर्देशन प्रणाली मुळे सुधारित अचूकता. निर्देशित पिनाक (LRGR-120) - १२० किमी पल्ला सरस अचूकतेसह.

६. हे सर्व प्रकारचे अग्निबाण आपण एकाच सेवेमध्ये असलेल्या प्रक्षेपक वाहनावरून डागता येतात, त्यामुळे रणभूमिवर उपयोग करताना वेगळे जास्तीचे भाग वाढवावे लागत नाहीत. (Inventry, Repairs, spares, Special tools) हाताळणे सोपे झाले आहे.

७. वाहने - उच्च गतिमानता (High Mobility) असण्यासाठी सर्वच वाहने उदा. प्रक्षेपक वाहने, पुरवठा वाहने, क्रेन, दुरुस्ती वाहने, नियंत्रण कक्ष, रडार असे सर्व प्रकारची आवश्यक वाहने इएचङ किंवा टाट्रा आणि टाटा यांची एकप्रकारची योजली आहेत. यामुळे शूट न्ड स्कूट (Shoot Scoot) क्षमता.

वरील सर्व बाबींचा विचार करता स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करून त्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन केल्या मुळे भारत अधिक सामर्थ्यशाली व बलवान होण्यामध्ये आत्म निर्भर भारत अभियानाची मोठी भूमिका राहिली आहे. आता आपण आपल्याच देशातील उद्योगांवर अवलंबून असल्यामुळे परावलंबित्व जे अन्यदेशांवर आपण शस्त्रास्त्रे, दारुगोळा, क्षेपणास्त्रे, रडार व अन्य संयंत्र अवलंबून असल्यामुळे कारगिल वेळी भेडसावलेल्या समस्येवर आत्मनिर्भरता हेच यशस्वी उत्तर आहे. पिनाकच्या १२० किमी, पल्ल्यामुळे आणि सेवेतीलच प्रक्षेपकांचा उपयोग यामुळे Survivability, quick व deployment आणि reduced logistic footprint शक्य झाले. हर काम देश के नाम हा मंत्र घेऊन सर्व घटकांनी देशासाठी कार्य केले तर अजेय भारत विश्वगुरु होणारच.

।। भारत माता की जय ।।

**काशिनाथ देवधर**

◈ ◈ ◈


संवाद

# संवाद ट्रेडप्रिंट्स

**छपाई क्षेत्रातील एक दर्जेदार सचोटीपूर्ण व्यवहार**

**बी-७, गोवईकर इमारत, शनिवार पेठ, पुणे - ३० दूरध्वनी : (०२०) २४४८५६३२**

**Email : sanwadpvt@gmail.com**

# स्वच्छ भारत - शाश्वत भारत

मानवाचे अस्तित्व पूर्णपणे पर्यावरणावर अवलंबून आहे कारण जगण्यासाठी आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट पर्यावरण आपल्याला प्रदान करते. आपण पृथ्वीवर जगू शकतो कारण पर्यावरण आपल्याला श्वास घेण्यासाठी स्वच्छ हवा, पिण्यासाठी पाणी, खाण्यासाठी अन्न, ऊर्जेसाठी सूर्यप्रकाश आणि जीवन जगण्यासाठी योग्य तापमान देते. वनस्पती, प्राणी, माती आणि नैसर्गिक संसाधने मिळून एक निरोगी परिसंस्था तयार करतात, जी मानवी जीवनाला आधार देते. संतुलित आणि सुरक्षित पर्यावरणाशिवाय मानवाचे अस्तित्व अशक्य आहे. म्हणूनच या ग्रहावर आपल्या सततच्या अस्तित्वासाठी पर्यावरणाचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे.

आजच्या जगात मानव पर्यावरणाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतो आहे, परंतु दुर्दैवाने आपण ते जतन करण्यापेक्षा जास्त वेगाने नष्ट करीत आहोत. जंगलतोड करून इमारती व शेतीसाठी जागा निर्माण करणे, कारखान्यांमधून आणि वाहनांमधून होणारे प्रदूषण, कचरा टाकणे, प्लास्टिक आणि रसायनांमुळे पाण्याचे प्रदूषण, नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरेकी वापर आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन–या आधुनिक क्रियांमुळे परिसंस्था नष्ट होत आहेत आणि मानवी अस्तित्व धोक्यात येत आहे. भविष्यकाळात निरोगी ग्रह हवा असेल तर पर्यावरण संरक्षणासाठी आपले प्रयत्न वाढवणे आणि हानिकारक सवयी बदलणे आवश्यक आहे.

- **या पर्यावरणीय समस्यांवर उपाय**

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी व्यावहारिक आणि शाश्वत उपायांची गरज आहे. त्यापैकी सर्वात प्रभावी उपाय म्हणजे कंपोस्टिंग, जे केवळ कचरा आणि प्रदूषण कमी करत नाही तर मातीची सुपीकता आणि कृषी उत्पादनक्षमताही वाढवते. आपल्या कचऱ्यातील सुमारे ६०–७०% सेंद्रिय असतो, जो कंपोस्ट करून उत्तम खतात रूपांतरित करता येतो. उरलेला २०–३०% प्लास्टिक आणि इतर न विघटनशील कचरा पुनर्वापरासाठी पाठवता येतो. योग्य कचरा व्यवस्थापनामुळे आपली घरे, रस्ते आणि मंदिरे स्वच्छ राहतात आणि पर्यावरणपूरक जबाबदारीही दाखवली जाते.

- **पर्यावरण व्यवस्थापनातील कंपोस्टिंगचे भविष्य**

भविष्यात कंपोस्टिंग हे परिपत्र अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार बनू शकते. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात अन्नकचरा व्यवस्थापनासाठी सामुदायिक कंपोस्टिंग यंत्रणा लागू होतील. घरांमध्ये स्मार्ट कंपोस्ट बिन्सचा वापर वाढेल, जे विघटन प्रक्रियेवर नजर ठेवतील. शेतीमध्ये कंपोस्टचा वापर केल्यास रासायनिक खतांची गरज कमी होईल, मातीची गुणवत्ता सुधारेल, पाणी वाचेल आणि आरोग्यदायी पिके मिळतील. लँडफिलमधून निर्माण होणारे मिथेन उत्सर्जन कमी होऊन हवामान बदलाशीही लढण्यास मदत होईल.

कल्पना करा–एक असे समाज, जिथे कचरा ‘कचरा’ म्हणून नाही, तर संसाधन म्हणून पाहिला जातो: अन्नकचऱ्यापासून कंपोस्ट तयार होतो, कंपोस्टने बागा बहरतात, बागांतून अन्न तयार होते आणि हे चक्र सतत चालू राहते. हा दृष्टीकोन आत्मनिर्भर, जागरूक आणि पर्यावरणहितैषी समाजाची कल्पना दर्शवतो.

- **घरच्या घरी सोपे कंपोस्टिंग उपाय**

घरात लहान जागेतसुद्धा कंपोस्टिंग सहज करता येते:

किचन कंपोस्ट बिन: छिद्रे असलेली बादली वापरा. हिरवा कचरा (फळभाज्या इ.) आणि तपकिरी कचरा (सुकलेली पाने, कागदाचे तुकडे) थरांमध्ये ठेवा. दर काही दिवसांनी हलवा. ४–६ आठवड्यात कंपोस्ट तयार होतो.

बाल्कनी/बकेट कंपोस्टिंग: फ्लॅटसाठी उत्तम. आर्द्र बेडिंग (कागदाचे तुकडे) आणि रेड विगलर कृमी वापरून उत्तम कंपोस्ट तयार होते.

वर्मीकंपोस्टिंग: कृमींकडून मिळणारे कास्टिंग हे अत्यंत समृद्ध नैसर्गिक खत आहे.

बॅकयार्ड पिट कंपोस्टिंग: लहान खड्डा खणून त्यात सेंद्रिय कचरा भरावा आणि मातीने झाकावे. काही काळात तो नैसर्गिकरित्या विघटित होतो.

कंपोस्ट टम्ब्लर्स: फिरणाऱ्या डब्यांमुळे विघटन प्रक्रिया जलद व स्वच्छ होते.

या सोप्या पद्धती दाखवतात की कचरा हा एक मौल्यवान संसाधन बनू शकतो आणि पर्यावरण टिकावाला हातभार लावू शकतो.

- **भारतामधील स्वच्छता आणि आध्यात्मिकता**

भारत हा अत्यंत आध्यात्मिक देश आहे. येथे विविध देव–देवता आणि त्यांच्या उत्सवांचे विशेष महत्त्व आहे. दिवाळी, नवरात्री, गणेशोत्सव, पोंगल अशा उत्सवांमध्ये देवतांचे स्वागत फुले, स्वच्छ घरे, सजवलेल्या रस्त्यांनी आणि विधीद्वारे केले जाते.

हिंदू धर्मानुसार देवता फक्त स्वच्छ आणि पवित्र ठिकाणीच वास्तव्य करतात असे मानले जाते. घरे आणि मंदिरे स्वच्छ असली तरी आसपासचे वातावरण घाण असेल तर ते देवतांसाठी अनादर मानले जाते. स्वच्छ मन आणि शांत वातावरण हे प्रार्थना व भक्तीसाठी आवश्यक आहे. स्वच्छता ही केवळ व्यावहारिक जबाबदारी नसून ती पवित्र कर्तव्यही आहे.

- **भारतामधील कचऱ्याची समस्या**

स्वच्छतेला सांस्कृतिक महत्त्व असतानाही भारतातील अनेक रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा दिसतो, ज्यामुळे देशाची सौंदर्य आणि सार्वजनिक आरोग्य धोक्यात येते. परदेशी पर्यटक भारताच्या संस्कृतीचे कौतुक करतात, परंतु रस्त्यांवरील कचऱ्यामुळे निराशाही व्यक्त करतात. दुर्लक्षित कचरा, अपुरे नगरपालिका व्यवस्थापन आणि नागरिकांमधील कमी असलेली जबाबदारी ही मोठी समस्या आहे.

पण चांगली गोष्ट अशी की आपल्या कचऱ्यापैकी ६०–७०% सेंद्रिय आहे, जो सहज कंपोस्ट करता येतो. उरलेला २०–३०% प्लास्टिक व अन्य कचरा पुनर्वापरासाठी योग्य आहे. कंपोस्टिंग, पुनर्वापर आणि स्वच्छता यामुळे आपण प्रदूषण कमी करू शकतो तसेच मानवांसाठी आणि देवांसाठी पवित्र आणि निरोगी वातावरण निर्माण करू शकतो.

- **सरकार आणि स्थानिक समुदायांची भूमिका**

प्रभावी कचरा व्यवस्थापनासाठी सरकार आणि स्थानिक समुदाय यांचे सहकार्य आवश्यक आहे. सरकार कचरापेट्या, कंपोस्टिंग सुविधा, पुनर्वापर केंद्रे, नियम आणि निधी उपलब्ध करून देऊ शकते. नागरिकांनी कचरा विभाजन, कंपोस्टिंग आणि स्वच्छता मोहिमेत सहभागी होणे गरजेचे आहे. अशा सहकार्यामुळे रस्ते, घरे आणि मंदिरे स्वच्छ राहतात, प्रदूषण कमी होते आणि पर्यावरणाबद्दलची जबाबदारीही वाढते.

सरकारचे समर्थन आणि नागरिकांचा सहभाग एकत्र आला की आध्यात्मिक मूल्ये आणि पर्यावरण संरक्षण दोन्ही साध्य होते–आणि मानव निसर्गाचा सन्मान राखत सांस्कृतिक परंपराही जपतो.

जनता या कार्यासाठी स्वयंसेवा करण्यास तयार आहे.

**माधवी सौंशी**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# निर्मलतेचा दुत : संत गाडगेबाबा

अंजन कांचन करवंदी तर कधी गडकोटांच्या चिरेबंदी यांनी संपन्न असणारा एक मंगलदायी प्रदेश म्हणजे; तुमचा आमचा महाराष्ट्र. या महाराष्ट्राचा इतिहासाकडे अगदी सहज दृष्टी टाकली तर विविध क्षेत्रातल्या विविध परंपरांचे दर्शन घडते. या अनेक परंपरांमधील एक परंपरा म्हणजे संत परंपरा. महाराष्ट्रामध्ये अलौकिक असे अनेक संत होऊन गेले आणि त्यांनी आदर्शांचे अमोल लेणे या भूमीला दिलेले आहे.

संतांनी प्रबोधनाद्वारे निर्माण केलेल्या ज्ञानमंदिराच्या ओवरीवर आजही मराठी माणूस नतमस्तक होतो आणि अडचणीच्या काळामध्ये संतवचनांचे स्मरण करत मार्ग काढतो. या ज्ञानमंदिराकडे भक्तिमय मनःचक्षूंनी पाहिल्यावर समजतं की या ज्ञानमंदिराचा पाया माउली ज्ञानेश्वरांनी रचला, संत नामदेवादी संत सज्जनांनी त्याच्या भिंती उभारल्या तर जगतगुरु संत तुकाराम त्याचा कळस ठरले.

थोडे आणखी पुढे जाऊन पाहिल्यास त्या कळसावर एक पताका फडकताना दिसते, त्या पताकेचा मंजुळ स्वर अस्पष्ट ऐकू येतो... आणखी पुढे गेल्यावर त्या स्वराचे शब्द ऐकू येतात .....गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला.....

मनाला शांत करणाऱ्या या भजनाच्या ओढीने जेंव्हा ज्ञानमंदिराकडे मन धाव घेते तेंव्हा, अंगात चिंध्यांचा अंगरखा, एका कानात फुटक्या बांगडीची काच आणि डोक्यावर मडके घेतलेल्या एका पुरुषसिंहाचे दर्शन घडते... ते म्हणजे राष्ट्रसंत गाडगे महाराज अर्थात संत गाडगेबाबा...

झिंगराजी राणोजी जानोरकर आणि सखुबाई झिंगराजी जानोरकर यांच्या पोटी, दि. २३ फेब्रु १८७६ रोजी कोतेगाव (शेंडगाव जि. अमरावती) येथे गाडगे बाबांचा जन्म झाला. त्यांचे खरे नांव डेबूजी. डेबूजींचे लहानपण, तारुण्य हे अगदी सर्वसामान्यांप्रमाणेच गेले, प्रापंचिक म्हणून संसार करत असतानाच त्यांना वैराग्य आले आणि वयाच्या २८ व्या वर्षी त्यांनी संसाराचा त्याग करून स्वतः चे आयुष्य समाजसेवेसाठी देण्याचा निश्चय केला. पुढील १२ वर्षे ते देशाटन करत समाजाचे हाल अपेष्टा बघत, दिनदुबळे, महारोगी, वंचित, शोषितांची सेवा करत एका वेगळ्याच रूपात जगापुढे प्रकट झाले.

ते जिथे जात तिथे सर्वप्रथम हातात खराटा घेऊन स्वच्छता करत असत, प्रारंभी त्यांची टिंगल टवाळी केली गेली परंतु त्यांनी जेंव्हा स्वच्छतेचे महत्व सांगायला सुरुवात केली तेंव्हा मात्र तीच मंडळी गाडगे बाबांना अवलिया समजून त्यांच्या दर्शनाला येऊ लागली. गाडगे बाबांनी कधीही कुणालाही आपले चरण स्पर्श करू दिले नाहीत. कोणी जास्तच लगट केली तर त्याच्या पाठीत खराटा मारून बाबा तिथून निघून जात असतं. संन्यास घेतल्यानंतर बाबा केवळ गोधडीवरच झोपत असत. त्यामुळे काहीजण त्यांना गोधडे महाराज असेही म्हणत. त्यांच्या डोक्यावरच्या मडक्यामुळे त्यांना काहीजण मडकेबुवा असेही म्हणत असत. पण बहुतांशी जनमानसांमध्ये त्यांची ओळख गाडगेबाबा किंवा गाडगे महाराज अशीच आहे.

ज्याच्या मनामध्ये सर्वच प्राणिमात्रांच्या बाबतीत दया ममता आणि कारुण्य आहे त्यांनाच संत म्हटले जाते अशी धारणा कीर्तनकारांच्या परंपरेत आहे. त्यामुळे गाडगे बाबा हे खऱ्या अर्थाने संतच होते. गाडगे बाबांनी समाजात उतरून जेंव्हा कार्य सुरु केले तेंव्हा प्रबोधनाकरता महाराष्ट्राच्या परंपरेचा कणा असणाऱ्या कीर्तनाचे माध्यम निवडले. कीर्तने किंवा प्रवचने म्हटले की त्यामध्ये पोथ्या पुराणांचे संदर्भ, ओव्यांचे निरूपण किंवा पौराणिक कथा हा भाग असतोच, परंतु गाडगे बाबांच्या कीर्तनामध्ये तुकोबारायांचे अभंग आणि कबीरांचे दोहे याव्यतिरीक्त अन्य काहीही नसे. ते आपल्या कीर्तनातून स्वच्छता, समानता आणि शिक्षण याचाच प्रसार करत असत. अंधश्रद्धा, जातीभेद, अनिष्ट रूढी, अस्पृश्यता यांच्यावर कडाडून हल्ला करणारे गाडगे बाबा भजन कीर्तनातून लोकांना तासनतास खिळवून ठेवत असत. गाडगे बाबांचे कीर्तन अज्ञजन, अडाणी, उपेक्षित आणि भरकटलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी असे.

किर्तन हा गाडगे बाबांचा श्वासच म्हणावा लागेल, आचार्य अत्रेंनी सांगितल्याप्रमाणे  सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पहावे

पाण्यात तर गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात. हजारोंच्या समुदायापुढे बाबा किर्तनाला उभे राहिले की बस्स ते त्यांचे राहत नसत, बराच वेळ दाटून आलेले आभाळ जसे गडगडून बरसायला लागते तसे, वंचित, पिडीत अज्ञजनांच्या दुःखद स्थितीने मन भरून आलेल्या बाबांची वाणी गडगडू लागे... गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला... हे भजन ते इतके तल्लीन होउन गात असत की श्रोतेसुद्धा अगदी त्या भजनामध्ये बुडून जात असत. काव्य, दोहे, अभंग आणि वऱ्हाडी बोलीतील विनोद यांची भरगच्च मेजवानी असणारे त्यांचे किर्तन दलितांच्या, अज्ञजनांच्या दुभंगलेल्या मनाला सावरत, धीर देत अखेर प्रबोधनाच्या मार्गावर घेऊन जात असे.

दगडात देव पाहू नका, माणसांत देव पहा असा संदेश ते आपल्या कीर्तनातून देत असत हे सत्य आहे परंतु त्याच बरोबर भजन आणि नामस्मरण करत स्वतःच देवत्वाला पोहोचण्याचा दिलेला संदेश आपण नाकारू शकत नाही. त्यांच्या अखेरच्या किर्तनामध्ये गाडगे बाबा स्पष्टपणे म्हणतात की, स्वतः मध्ये देवत्व आणले तर बाहेर देव शोधायची गरजच नाही. या साठी त्यांनी संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अभंगाचा संदर्भ दिलेला आहे, तुकोबाराय म्हणतात 'देव पाहण्यासी गेलो अन स्वतः देवची झालो' म्हणजे भगवंताच्या नामस्मरणाचा महिमा इतका अगाध आहे की, त्याचे नामस्मरण करणारा भक्त हा अखेर देवत्वाला पोहोचतो.

यांवरून संत गाडगे बाबांची धार्मिकता स्पष्ट होते, दुर्दैवाने आज त्यांच्या वाक्याचा अर्धाच भाग सांगून समाजातील नैतिक धार्मिकता संपवण्याचा प्रयत्न केला जातो आहे ही बाब दुर्दैवी आहे. गाडगे बाबांनी मूर्तीमध्ये देव पाहिला का नाही यांवर वादविवाद होऊ शकेल पण एक बाब विसरता कामा नये की, स्वतः बाबांनी मूर्तीत देव पाहिला नसेलही परंतु ज्यांना मूर्तीमध्ये देव दिसतो अश्या भक्तजनांची देहू, आळंदी, पंढरपूर या ठिकाणी धर्मशाळा उभारण्याचं काम प्रामुख्याने कोणी केले असेल तर ते गाडगे बाबांनीच केले आहे विसरता येणार नाही.

आपल्या पन्नास वर्षाच्या सार्वजनिक आयुष्यामध्ये कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी लाखो रुपयाचा निधी उभा केला होता परंतु त्यातील एका कवडीलाही स्पर्श न करता या निधीमधून धर्मशाळा, विद्यार्थीगृहे, भोजनशाळा आदी गोष्टी सुरु केल्या होत्या. पंढरपुरातील 'संत चोखामेळा' ही धर्मशाळा त्याचेच एक उदाहरण होय. लाखो रुपये खर्च करून उभारलेली ही धर्मशाळा गाडगे बाबांनी डॉ. आंबेडकरांना समाजकार्यासाठी देऊन टाकली होती.

विज्ञानवाद मांडत असताना, अंधश्रद्धेचे निर्मूलन करत असताना ज्यांच्या विकासासाठी हे करायचे आहे त्या समाजाच्या मूल-श्रद्धांना ठेच पोहोचणार नाही याची खबरदारी गाडगे बाबानी घेतली होती असेच वाटते.

संत गाडगे बाबांचे, लोकमान्य टिळक, डॉ. आंबेडकर, आचार्य अत्रे यांचेशी चांगलेच ऋणानुबंध होते. गाडगे बाबांनी कधीही स्वतः जातीभेद, अस्पृश्यता मानली नाही त्यामुळे सर्वच महापुरुषांमध्ये असणारा हा सद्गुण त्यांची महानता सांगून जातो. झाडूचे तंत्र आणि दरिद्रीनारायणाची पूजा हा मंत्र गांधीजींनी दिला असा बऱ्याच जणांचा गैरसमज आहे, स्वच्छता आणि समानता याचे बीज जर कोणी रोवले असेल तर ते गाडगेबाबांनी रोवले असे माझे स्पष्ट मत आहे.

प्राणिमात्रांवर दया हे संतांचे प्रमुख लक्ष्मण आहे हे वर सांगितलेच आहे, गाडगेबाबानी मुक्या जनावरांचे प्राण घेऊ नका हा संदेश नेहमीच दिला आहे. त्यासाठी ते कबीरांच्या दोह्यांचा संदर्भ देत असत.

**तिरथ जावो, काशी जावो चाहे जावो गया ।**
**कबीर कहे कमालकू, सबसे बडी दया ।।**

गाडगे बाबानी उभारलेल्या निधीचा निस्वार्थ केलेला विनियोग पाहता, त्यांनी केलेले प्रबोधन पाहता, त्यांनी समाजातील पीडितांची केलेली सेवा पाहता त्यांचा आदर्श हा आजच्या तरुणाईने जरूर घेतला पाहिजे.

अज्ञजनाना मुख्य प्रवाहात आणून, आपला परिसर स्वच्छ ठेवून, शिक्षणाची कास धरून, निस्वार्थपणे समाजसेवा करून संत गाडगे बाबांची ही दिव्य परंपरा अव्याहत ठेवली पाहिजे एवढीच अपेक्षा ठेवतो आणि थांबतो. गाडगे बाबांबद्दल एवढेच म्हणेन की;

**जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले**
**साधू तेथेचि ओळखावा, देव तेथेचि जाणावा .....**
**गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला .....**

**श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈

# निर्णयप्रक्रिया आणि धर्म

आपल्या पैकी प्रत्येकजण जाणत्या–अजाणत्या वयापासून ते मरेपर्यंत दरदिवशी, दरतासाला काही ना काही निर्णय घेत असतो. व्यक्ती व समाज हे दोघेही असे निर्णय घेत असतात. आपल्या कपड्याचा रंग निवडण्यापासून ते दोन देशातील करारापर्यंत सर्व ठिकाणी छोटे–मोठे निर्णय होत असतात. शिक्षण, लग्न, घर इत्यादी ठळक उदाहरणं वैयक्तिक निर्णय म्हणून, तर मतदान, सामाजिक उपक्रम, सामुहिक रीतीभाती यासारखी ठळक उदाहरणं सामाजिक निर्णय म्हणून पाहता येतील.

short term व long term साठी चांगले निर्णय घेता येणं ही प्रत्येक मनुष्य व समाजासाठीही एक अनिवार्य गोष्ट आहे. ज्या गुणवत्तेचा / quality चा निर्णय – त्या प्रमाणे व्यक्ती/ समाजाचं भविष्य बदलतं, इतकं मोठं त्याचं महत्त्व आहे. निर्णयाचे परिणाम प्रत्यक्षरूपात दिसतात, पण त्यामागील प्रक्रिया आपल्या मनात काहीशी अदृश्य राहते.

या निर्णयप्रक्रियेबद्दल एक रंजक माहिती लक्षात आली, ती म्हणजे निर्णयप्रक्रियेचे टप्पे. आपण आपल्या जीवनात निर्णय घेताना हे टप्पे कळत–नकळत पार करतच असतो. ते टप्पे अनेकदा आपल्या मनात एकाच वेळी process केले जात असतात, त्यामुळे ते सहजगत्या वेगवेगळे लक्षात येत नाहीत. हे टप्पे खालीलप्रमाणे –

१. घटनेशी / विषयाशी एक्सपोजर – ज्ञानेन्द्रियांमार्फत मनुष्याच्या समोर कोणतीही गोष्ट / वस्तू / परिस्थिती पोचणे, किंवा मनात विचार/कल्पना येणे.

२. विश्लेषण (analysis) – समोर आलेल्या विषयाचे छोटे छोटे तुकडे / भाग करणे + निरीक्षण करणे.

३. स्मृतीचालना – निरीक्षण केलेल्या गोष्टींचं आपल्या स्मृती / आकलन / ज्ञानसंचयातील गोष्टींशी तुलना करणे.

४. संश्लेषण (synthesis) – स्मृती / आकलनातील / ज्ञानसंचयातील साठ्यानुसार निरीक्षण केलेल्या गोष्टींचं आपल्या आकलनानुसार मनाच्या पातळीवर well-co ordinated image बनवणे.

५. निर्णय – बनलेल्या मनाच्या पातळीवरील ळारसश नुसार निर्णय घेणे.

यावरून निर्णयप्रक्रियेबद्दलची काही वैशिष्ट्यं लक्षात आली.

ही निर्णयप्रक्रिया प्राचीन आदिवासी मानवापासून ते भविष्यात जोपर्यंत मानव जिवंत आहे, तोपर्यंत चालूच राहणार आहे. तिचे विषय, प्रश्न बदलतील, प्रक्रियेतील प्रगल्भता (maturity) बदलेल, पण प्रक्रिया राहिलच. म्हणजे निर्णयप्रक्रिया ही दीर्घकाळ चालणारी अशी म्हणता येईल.

एका बाजूने ती सर्व विषयांमध्ये सारखी कॉमन अशी universal प्रकारची आहे, तर दुसरीकडे जो मनुष्य ती वापरतोय त्याच्यावर केंद्रित झालेली आहे (objective). प्रत्येक मनुष्य व समाज अगदी नैसर्गिक instinct ने ती स्वतःच्या सूक्ष्म व स्थूल हितासाठी वापरत असतो.

आपण 'प्रत्यक्ष परिस्थितीनुसार' निर्णय घेत नाही, तर त्या परिस्थितीची / वस्तूबद्दलची आपल्या मनात जी image बनते, त्यानुसार निर्णय घेतो!

आपलं स्वत:च्या मनातील आकलन ज्या प्रकारे बदलेल, तशी आपली कृती बदलेल!

- **निर्णयप्रक्रियेची प्रगती: वैचारिक संदर्भबिंदू –**

जसा मनुष्य वैचारिकदृष्ट्या सजग होऊन जगायला लागतो, तसा कळत नकळत त्याचा वरील वैचारिक प्रक्रिया सुलभ–सातत्याने फळ देणारी बनवण्याकडे प्रवास सुरू होतो. अशा वेळी व्यक्तीला (व समाजाच्या बाबतीत समाजाला) वरील प्रक्रियेला मदत करणारे वैचारिक संदर्भबिंदू आवश्यक वाटायला लागतात. असे संदर्भबिंदू वरील संतत निर्णयप्रक्रियेचा परिपाक म्हणून निर्माण झालेले असतात. म्हणून त्याना वरील प्रक्रियेचेच गुणधर्म असतात. जसे की, हे वैचारिक संदर्भबिंदू खालील गोष्टी करतात.

१. भोवतालचे विषय/जगाबद्दलचं व्यक्तीचं आकलन सुलभ करायला मदत करतात.

२. व्यक्तीची निर्णयप्रक्रिया विविध विषयांना सामावून घेण्यासाठी व्यापक करायला मदत करतात. त्याचवेळी ती सूक्ष्म बनवून

तिला स्व सोबत विविध विषयांना relate करायला मदत करतात.

३. ते सतत स्व–कडे लक्ष केंद्रित करून जगायला मदत करतात (स्वार्थी स्वमग्नता असा येथे अर्थ नव्हे, तर स्व–च्या अस्तित्वाची मूलभूत जाणीव असा अर्थ घ्यावा).

४. ते निर्णयप्रक्रियेसारखेच दीर्घकाल लागू पडतात, सारखे बदलण्याची गरज पडत नाही.

५. ते निर्णयप्रक्रियेला सातत्यशील (Consistent), नियमित (standardize) करतात,

अशा 'वैचारिक संदर्भबिंदूंची जाणवणारी गरज' हेच धर्म या संकल्पनेचं माणसांच्या वैचारिक विश्वातील बीज होय. व ती गरजच धर्मसंकल्पनेचा वैचारिक विस्तार करायला कारणीभूत ठरते. धर्म या संकल्पनेचे वैचारिक गुणधर्म पाहिल्यास तेही वरील वैचारिक संदर्भबिंदूंच्या १, २, ३ व गुणधर्मांशी जुळताना दिसून येतील. यावरून हा पडताळा (verification) होतं, की असे उत्क्रांत वैचारिक संदर्भबिंदू म्हणजे धर्मसंकल्पना होय.

अर्थात, जरी अशा संदर्भबिंदूंची गरज लक्षात आली, तरी ते योग्य प्रकारे व्यक्तीत वा समाजात cultivate होतीलच असं नाही. त्यामुळे जगात वेगवेगळे धर्मही उदयाला आले, काही उन्नत, काही अवनत, काही लबाड, काही रानटी, काही अर्धवट वाढ झालेले, काही खुरटलेले इत्यादी. पण ते तसे झाले म्हणून मूळ संकल्पनेचं महत्त्व कमी होत नाही, तर ते वाढतं. कारण मूळ संकल्पनेकडे लोकांनी केलेल्या दुर्लक्षामुळेच तर काही समाजांत वैचारिक संदर्भबिंदू – धर्मांची वाढ चुकीच्या प्रकारे झाली.

- **धर्म नष्ट का होत नाही?**

मनुष्याच्या वैचारिक उत्क्रांतीचा भाग असलेल्या मूलभूत निर्णयप्रक्रियेवर धर्म उभा असल्यानेच हजारो वर्षे धर्माची बाह्य रचना चांगली–वाईट बदलत असूनही धर्म ही मूळ संकल्पना जगातील समूहांतून नाहीशी झालेली नाही. आधुनिक जगात समाजवादासारख्या विचारसरणींनी धर्म नष्ट करायचे प्रयत्न केले. पण त्या अपयशी प्रयत्नात अशा विचारसरणीच हेकेखोर वैचारिक स्वरूप धारण करून बसल्या.

यावरून एक अतिशय महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती ही, की धर्म ही एक कपोलकल्पित/काल्पनिक गोष्ट नसून, मनुष्याच्या वैचारिक उत्क्रांतीचा भाग असलेली ती एक संकल्पना आहे. व्यक्तीमध्ये व समाजामधील लोकांत निर्णयप्रक्रियेची गुणवत्ता वाढवण्यासाठी (निर्णयप्रक्रियेच standardization, consistency, universalization करण्यात) धर्म संकल्पनेचा मोठा व खोलवर वाटा आहे. ज्या समाजांत धर्मसंकल्पनेची वैचारिक उन्नती झालेली आहे, ते समाज जीवनसंघर्षात अधिक चांगले निर्णय घेऊ शकतात. असे समाज जगाच्या इतिहासात आपापल्या वैचारिक मूल्यांसह अधिक काळ टिकतात असं लक्षात येतं (उदा. हिंदू समाज).

आज जगातील प्रत्येक जागरूक मनुष्यासमोर धर्म कल्पना योग्य की त्याज्य असा प्रश्न उभा आहे. त्याच्यावर 'निर्णय' करणे हाही निर्णयप्रक्रियेचाच एक भाग आहे. धर्माला सरसकट टाकून देण्यापेक्षा त्याला आपल्या वैचारिक जीवनात व समाजात अधिक प्रगल्भ करत नेणे हे जास्त फायदेशीर आहे, हे यावरून उघड आहे.

**श्री. अमित देवधर**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
# महाराष्ट्र प्रांत शिबीर, तळजाई, पुणे : एक आठवण

१४, १५, १६ जानेवारी १९८३ मध्ये झाले होते.

- **तळजाई शिबिर गुळाच्या पोळ्या**

तळजाई येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रांतिक शिबिराची तयारी सुरू होती. मकर संक्रांत आहे, तर येणाऱ्या पस्तीस हजार स्वयंसेवकांना जेवणात गुळाच्या पोळ्या देऊया असा विचार झाला. या निमित्ताने घरोघरी संपर्कही होणार होता. तत्कालीन माननीय प्रांत संघचालक आणि शिबिराचे संयोजक माननीय बाबाराव भिडे हे मात्र त्याला राजी नव्हते. शिबिर संघाचे, मग लोकांकडून पोळ्या कशासाठी गोळा करायच्या? असं त्यांचं म्हणणं होतं. कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर गुळाच्या पोळ्या गोळा करण्याच्या उपक्रमाला त्यांनी मान्यता दिली. नंतर मात्र मा. बाबांनी लगोलग पुणेकरांना आवाहन करणारं एक पत्रही लिहून दिलं. ते पत्र मोडीतील होतं. त्याचं आम्ही लगेच भाषांतर करून घेतलं. बाबांची मोडी स्वाक्षरी पत्रात तशीच ठेवली. या पत्राचं शहरात घरोघरी वाटप करण्यात आलं.

'प्रांतात हिंदुत्वाचा विषय पुढे नेण्यासाठी शिबिर ठरलं आहे. शिबिराला येणारे आपले पाहुणे समजून त्यांचं तोंड गोड करण्यासाठी गुळाच्या पोळ्या आपल्या घराजवळच्या संकलन केंद्रावर द्याव्यात,' असं आवाहन या पत्रात होतं. शिबिराच्या तयारीत मग खातेवाटप झालं आणि गुळाच्या पोळ्या गोळा करण्याचं खातं माझ्याकडे आलं. मला सहाय्यक म्हणून वासुदेवराव कुंटे होते. काम सुरू करताना 'मोतीबागे'त पहिली नगर कार्यवाहांची बैठक झाली. घरोघरी पत्र गेल्यामुळे प्रतिसाद यायला सुरुवात झाली. मात्र अनेक ठिकाणाहून असे निरोप आले की, गुळाच्या पोळ्या देण्याची इच्छा आहे; पण त्या कशा करायच्या याची माहिती नाही. मग त्यावर उपाय म्हणून गुळाच्या पोळ्या कशा तयार करायच्या याची माहिती सांगायची आणि त्याचं प्रात्यक्षिकही करून दाखवायचं, असा कार्यक्रम सुरू केला.

श्रीमती हेर्लेकर यांचा स्वयंपाक करून देण्याचा उद्योग होता. गुळाच्या पोळ्या करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या प्रात्यक्षिकांचे कार्यक्रम नगरशः आयोजित केले.

पोळ्या गोळा करून प्रत्यक्ष द्यायच्या कुठे, असा विचार पुढच्या टप्प्यात आला. मग त्यासाठी मुख्य पोळी संकलन केंद्र आणि उपकेंद्र अशी योजना तयार केली. दहा उपकेंद्रातील पोळ्या मुख्य केंद्रावर येतील आणि तेथून त्या शिबिरस्थानी पाठवल्या जातील, अशी संपूर्ण शहराची रचना उभी राहिली. प्रत्येक नगराला एक प्रमुख नियुक्त झाला. गुळाच्या पोळ्या संकलनासंबंधी सातत्यानं बैठका सुरू झाल्या. किती पोळ्या गोळा होणार याचे आकडे येऊ लागले. नगरांमध्ये निकोप स्पर्धाही सुरू झाली.

शिबिर पठारावर आहे. कदाचित पोळ्यांना मुंग्या लागतील, हे लक्षात घेऊन गुळाच्या पोळ्या पुठ्ठ्याच्या खोक्यांमधून न्यायच्या असं ठरलं. एवढी खोकी आणायची कुठून? मग पुण्यातील औषध विक्रेत्यांच्या बैठका सुरू झाल्या. त्यांना आवाहन केलं की, तुम्ही तुमच्याकडील खोकी द्या. ते अगदी लगेच तयार झाले आणि त्यांच्याकडून खूप मोठा प्रतिसाद मिळाला.

प्रत्येक घरातून पाच पोळ्या याव्यात आणि ज्यांना शक्य आहे त्यांनी अधिक द्याव्यात, अशी योजना होती. किती पोळ्या गोळा झाल्या याची अचूक माहिती मिळण्यासाठी प्रत्येक केंद्राला तक्ताही करून देण्यात आला होता. त्यात गुळाच्या पोळ्या किती, साध्या किती आणि भाकरी किती याची नोंद केंद्रप्रमुखांनी केली.

खडीवाले वैद्य एक हजार गुळाच्या पोळ्या देणार आहेत, असं आम्हाला समजलं. म्हणून मी आणि वासुदेवराव कुंटे त्यांना भेटायला गेलो. तर तातडीनं त्यांनी आमच्या पुढ्यात गुळाच्या पोळ्या आणल्या आणि म्हणाले, 'खाऊन बघा, अशा पोळ्या चालतील नां.' शिवाय हेही सांगितलं की, पोळ्या टोपल्यांमध्ये भरून त्या टेम्पोतून पाठवण्याची व्यवस्थाही मीच

करणार आहे. असा प्रतिसाद सर्वत्र मिळत होता. षशिबिर ज्या भागात होतं, त्या भागाचे नगरसेवक शिवाजीराव ढुमे हेही एक हजार गुळाच्या पोळ्या देणार आहेत असं समजलं. म्हणून आम्ही त्यांनाही भेटायला गेलो. ते काँग्रेसचे नगरसेवक. त्यांना म्हटलं, 'तुम्ही शिबिराला पोळ्या देत आहात म्हणून आम्ही मुद्दाम तुम्हाला भेटायला आलोयं.' तर ते म्हणाले, 'अहो, शिबिर माझ्या वॉर्डमध्ये आहे. म्हणजे मी यजमान आहे शिबिराचा. माझ्याकडे लोक येणार, मग मी गुळाच्या पोळ्या द्यायला नकोत का? म्हणून मी पोळ्या देतोय.' असा प्रतिसाद होता सर्वत्र. शहरात जिथे साध्या पोळ्यांची विक्री केली जायची तिथे शिबिराच्या आधीचे पाच-सात दिवस 'तुम्ही गुळाच्या पोळ्या करून द्याल का' अशी विचारणा सातत्यानं केली जात होती. या शिबिरावर लोकांनी अलोट माया केली. टेम्पो चालक असोत वा रिक्षा चालक कोणीही कोणत्याही वाहतुकीसाठी पैसे घेतले नाहीत.

- **असा होता प्रतिसाद**

प्रत्यक्ष १३ जानेवारी १९८३ रोजी गुळाच्या पोळ्यांचं संकलन संपूर्ण शहरातील केंद्रांवर सुरू झालं. मात्र अनेक घरांमधून १२ जानेवारी पासूनच पोळ्या यायला सुरुवात झाली होती. दिवसभर संकलन सुरू होतं. अनेक केंद्रांवर छान सजावट करण्यात आली होती. कमानी उभारण्यात आल्या होत्या. तळजाई शिबिर गूळपोळी संकलन केंद्र असे कापडी फलकही लावण्यात आले होते. छोट्या केंद्रांवर जमा झालेल्या पोळ्या मुख्य केंद्रांवर येत होत्या आणि तेथून त्या टेम्पोतून शिबिरस्थानी पाठवल्या जात होत्या. शहरात शिबिरमय वातावरण झालं होतं. नागरिक उत्साहानं पोळ्या आणून देत होते. रिक्षाचालकांनी त्यांच्या रिक्षांवर भगवे ध्वज लावले होते. शिबिरस्थान बघण्यासाठी आठ-दहा दिवस आधीपासूनच नागरिक मोठ्या संख्येनं येत होते. गुळाच्या पोळ्या हे शिबिर घरोघरी पोहोचण्याचं माध्यम झालं होतं. पोळी नुसती द्यायची नाही, हा संस्कार. त्यामुळे गुळाच्या पोळ्यांबरोबरही चटणी, साखर किंवा साध्या पोळ्यांबरोबर गुळाचा खडाही दिला जात होता.



पुण्यातील सर्व पेठा, सोसायट्या, बंगले, सर्व भाग आणि सर्व वस्त्यांमध्ये या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. अगदी गोखलेनगरमधील चाळी, काशेवाडी, सोनावणे चाळ, वैदूवाडी, वडारवाडी येथील केंद्रांवरही पोळ्या मोठ्या संख्येत गोळा झाल्या. गोखलेनगर चाळींमधील कार्यकर्त्यांनी तर पोळ्यांच्या संख्येचा विक्रम करायचा असं पहिल्यापासूनच ठरवलं होतं. चंदू शेट्टी, अरविंद देवकर, सुरेश कुर्‍हाडे असे काही कार्यकर्ते त्यात अग्रणी होते.

- **समाजाचं अलोट प्रेम**

हा विषय सुरू होता, तेव्हा संघाचे वरिष्ठ अधिकारी आम्हाला म्हणायचे, एक लाख गुळाच्या पोळ्या गोळा झाल्या तर तुम्ही जिंकलात. प्रत्यक्षात शहरातून पावणेदोन लाख पोळ्या गोळा झाल्या आणि काही हजार गुळाच्या पोळ्या नागरिकांनी थेट शिबिरात आणून दिल्या. समाजाचं जे अलोट प्रेम संघाच्या कामावर आहे, त्याचीच तर ही प्रचिती होती. शिबिराला आलेल्या सर्वांना पुणेकरांनी आपलं मानलं आणि 'हिंदू सारा एक...' ही अनुभूती मिळाली.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक श्री. श्रीधरपंत फडके यांनी सांगितलेल्या आठवणींचे शब्दांकन.**

◈ ◈ ◈

# श्रीदत्तमहाराजांची नावे आणि त्यांचा अर्थ



१. **दत्त :** दत्त म्हणजे 'आपण आत्मा आहोत' याची अनुभूती देणारा. प्रत्येकात आत्मा आहे; म्हणून प्रत्येक जण चालतो, बोलतो आणि हसतो. यावरून 'आपल्यात देव आहे', हेच सत्य आहे. त्याच्याविना आपले अस्तित्वच नाही. आपल्याला याची जाणीव झाली, तर आपण प्रत्येकाशी प्रेमानेच वागू. या दत्त जयंतीला ही जाणीव जागृत करण्याचा आपण निश्चय करूया..

२. **अवधूत :** जो अहं धुतो, तो अवधूत! अभ्यास करतांना आपल्या मनावर ताण येतो ना? खरेतर अभ्यास करण्यासाठी बुद्धी आणि शक्ती देणारा देवच आहे. पण 'अभ्यास करणारा मी आहे', असे वाटल्याने ताण येतो. हाच आपला अहंकार आहे. दत्त जयंतीला आपण प्रार्थना करूया, 'हे दत्तात्रेया, माझ्यातील अहं नष्ट करण्याची शक्ती आणि बुद्धी तूच मला दे....

३. **दिगंबर :** दिक् म्हणजे दिशा हेच ज्याचे अंबर, म्हणजे वस्त्र आहे असा! जो सर्व व्यापी आहे, ज्याने सर्व दिशा व्यापल्या आहेत, तो दिगंबर! जर ही देवता मोठी आहे, तर आपल्या सारख्या सामान्य जिवांनी त्याला शरणच जायला हवे. तसे केल्यासच आपल्यावर त्याची कृपा होईल. आपण प्रार्थना करूया, 'हे दत्तात्रेया, शरण कसे जायचे? ते तूच आम्हाला शिकवा.'

- **दत्ताच्या परिवाराचा भावार्थ**

४. **गाय :** दत्ताच्या मागे असलेली गाय ही पृथ्वी आणि कामधेनू यांचे प्रतीक आहे. कामधेनू आपणाला जे हवे, ते सर्व देते. पृथ्वी आणि गायही आपल्याला सर्व काही देतात.

५. **४ कुत्रे :** हे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या ४ वेदांचे प्रतीक आहेत.

६. **औदुंबर वृक्ष :** दत्ताचे पूजनीय रूप! या वृक्षात दत्त तत्त्व अधिक आहे.

- **दत्ताच्या मूर्तीतील वस्तूंचा भावार्थ पुढील प्रमाणे आहे.**

१. कमंडलू आणि जपमाळ : हे ब्रह्मदेवाचे प्रतीक आहे.

२. **शंख आणि चक्र :** श्री विष्णूचे प्रतीक आहे.

३. **त्रिशूळ आणि डमरू :** शंकराचे प्रतीक आहे.

४. **झोळी :** ही अहं नष्ट झाल्याचे प्रतीक आहे. झोळी घेऊन दारोदारी हिंडून भिक्षा मागितल्याने अहं नष्ट होतो.


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**


स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास जनसेवेच्या
'घरकुल' कर्जावर !
जनसेवा घरकुल कर्ज
रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)
* अटी लागू
आकर्षक व्याजदर
तत्पर सेवा
अल्प प्रोसेसिंग फी
रु. 2 कोटींपर्यंत कर्ज
संपर्क क्र. - 84 85 87 12 52
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.
www.janasevabankpune.net

वार्षिक वर्गणी रू. २००/- फक्त

Date of Publication : 26/01/2026 and
Date of Posting : 28/01/2026 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध (मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे 'हिंदुबोध'.

- मासिक मुल्य रु. २०/-
- वार्षिक वर्गणी रु. २००/-
- त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo



## * हिंदुबोध जाहिरात दरपत्रक *

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | |
|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रु. १.५ लाख |
| साधे पान | रु. १ लाख |
| साधे अर्धे पान | रु. ५०,०००/- |
| साधे १/४ पान | रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान | रु. १२,०००/- |
| साधे १/१६ पान | रु. ६,०००/- |
| सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) | रु. २,१००/- |
| हिंदुबोध अंक | मुल्य रु. २०/- |
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | रु. ५००/- |

## * हिंदुबोधची वर्गणी *

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb



कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

द्वारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१